POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०४ ● अंक-२६३ ● मुंबई, शुक्रवार, २५ एप्रिल २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

पर्यटकांच्या मदतीसाठी महायुती सरकारमध्ये चढाओढ?

शिंदे-महाजनांचं वेगवेगळं बचावकार्य!

■मुंबई। प्रतिनिधी :

काश्मीरमध्ये अडकलेल्या मराठी पर्यटकांना आणण्यावरुन महायुती सरकारमध्येच चढ-ाओढ सुरु असल्याचा आरोप विरोधकांनी केलाय. मदत व पुनर्वसनमंत्री गिरीश महाजन श्रीनगरमध्ये जाण्याअगोदरच एकनाथ शिंदेंनी श्रीनगरमधून बचावकार्य सुरु केलंय. शिंदे समांतर सरकार चालवत असल्याचा आरोप शिवसेना वइळनं केलाय. तर विरोधकांच्या या टीकेचा सरकारनं समाचार घेतलाय.

पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यामुळं पर्यटनासाठी काश्मीरमध्ये गेलेले हजारो पर्यटक तिथंच अडकून पडलेत. या सगळ्या मराठी पर्यटकांना महाराष्ट्रात परत आणण्यासाठी सरकारी पातळीवर तातडीनं हालचाली सुरु झाल्यात. उपमुख्यमंत्री

एकनाथ शिंदे विशेष विमानानं श्रीनगरमध्ये गेले. त्यापूर्वीच श्रीकांत शिंदेंचे काही कार्यकर्ते श्रीनगरमध्ये मराठी माणसांच्या मदतीसाठी लागले होते.

दुसरीकडं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांना श्रीनगरमध्ये पाठवलंय. त्यांनीही मरा-ठी पर्यटकांना महाराष्ट्रात धाडण्यासाठी व्यवस्था केलीये. शेवटचा मराठी माणूस महाराष्ट्रात जाईपर्यंत श्रीनगरमध्ये थांबण्याचा त्यांनी निर्धार केलाय. एकाच महायुती सरकारचं एकत्र बचावकार्य अपेक्षित होतं. पण शिवसेना आणि भाजपचं वेगवेगळं बचावकार्य सुरु असल्याचा मुद्दा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या संजय राऊत यांनी उपस्थित केला.

संजय राऊतांनी केलेल्या टीकेला पाणीपुरवठामंत्री गुलाबराव पाटील यांनी प्रत्युत्तर दिलंय. विरोधक मराठी माणसाच्या मदतीतही राजकारण करत असल्याचा पलटवार गुलाबराव पाटलांनी केलाय. महायुती सरकार एकदिलानं एकजुटीनं मदतकार्य करत असल्याचं खासदार नरेश म्हस्केंनी सांगितलंय.

मदतीच्या कामात कुणी राजकारण करु नये असा सल्ला राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरेंनी दिलाय. सत्ताधा-यांच्या उणिवा काढणं हे विरोधकांचं कामच आहे. मराठी पर्यटकांच्या बचावकार्यातही महायुतीत नसलेली एकी विरोधकांना ठळकपणं जाणवली.. तोच मुद्दा विरोधकांनी उपस्थित केलाय.

मदतीवरुन शिवसेना विरुद्ध शिवसेना

काश्मीरमध्ये अडकलेल्या पर्यटकांना महाराष्ट्रात परत आणण्यासाठी शिवसेनेनं श्रीनगरमध्ये मदतकार सुरु केलंय. या मदतकार्यात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचा एकही नेता दिसत नसल्याचा आरोप शिवसेना नेत्यांनी केलाय. उद्धव ठाकरेंच्या पक्षाचा एकही नेता मुंबई विमानतळावरही दिसला नसल्याचा आरोप पाणीपुरवठामंत्री गुलाबराव पाटलांनी लगावलाय.एकनाथ शिंदेंनी उद्धव ठाकरेंचा खरपूस भाषेत समाचार घेतलाय. मराठी माणसांना मदत न करता घरात बसून बोलणं सोप्पं असल्याचा टोला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी लगावलाय.शिवसेनेनं मराठी माणसांना श्रीनगरमधून आणण्यासाठी विमानं पाठवली. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं चार सीटर गाडी तरी पाठवली का असा सवालही शिवसेनेनं विचारलाय. शिवसेना फुटल्यापासून दोन्ही गट एकमेकांवर टीका करण्याची एकही संधी सोडत नाही. श्रीनगरमधील मदतीच्या मुद्यावरही ठाकरेंच्या शिवसेनेनं एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेला डिवचण्याची संधी सोडली नाही. पण या टीकेचा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षावरच बुमरँग झालंय.

संघटनेकडून इशारा

राज्याचे उपमुख्यमंत्री लवकरच वाशिम जिल्ह्याच्या दौऱ्यावर येणार आहेत. त्यांच्या भेटीच्या वेळी हे निवेदन त्यांना वैयक्तिकरित्या देण्यात येणार असून, त्यानंतरही जर शासन आणि विमा कंपनीने योग्य प्रतिसाद दिला नाही, तर स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने न्यायालयीन लढाई लढण्यात येईल. शेतकऱ्यांचे हक्क मिळवण्यासाठी कोर्टाची पायरी चढण्यास मागेपुढे पाहिले जाणार नाही, असा ठाम इशारा संघटनेकडून देण्यात आला. या आंदोलनामुळे जिल्हा प्रशासनासह विमा कंपनीवरही दबाव वाढण्याची शक्यता आहे. हजारो शेतकऱ्यांच्या भावना आणि उद्विग्नतेचा विस्फोट आजच्या आंदोलनात प्रकर्षाने दिसून आला.

शेतकऱ्यांवर पुन्हा अन्याय, उभारलं मोठं आंदोलन

■मुंबई। प्रतिनिधी :

वाशिम जिल्ह्यातील शेतकरी अजूनही खरीप २०२४ मधील अतिवृष्टी आणि निसर्गाच्या कोपामुळे झालेल्या नुकसानीच्या भरपाईसाठी संघर्ष करत आहेत. पीकविमा योजनेअंतर्गत अनेक शेतकऱ्यांनी विमा हप्ते भरूनही अद्याप त्यांना विमा रक्कम प्राप्त झालेली ना-ही. शासनाकडून जाहीर झालेली अतिवृष्टीची नुकसान भरपाई सुद्धा वितरित झालेली ना-ही. या अन्यायाविरोधात आवाज उठवत आज स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर भव्य ठिय्या आंदोलन करण्यात आले.

हे आंदोलन स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे युवक प्रदेशाध्यक्ष दामुअण्णा इंगोले यांच्या नेतृत्वाखाली पार पडले. या आंदोलनात वाशिम जिल्ह्यातील विविध तालुक्यांमधून आलेले हजा-रो शेतकरी सहभागी झाले होते. शेतकऱ्यांनी आपल्या पीकविमा क्लेमशी संबंधित सर्व आवश्यक कागदपत्रांची प्रत सुद्धा सादर केली. या आंदोलनानंतर जिल्हाधिकारी मॅडम यांना अधिकृत निवेदन देखील देण्यात आले.

शेतकऱ्यांच्या प्रमुख मागण्या काय?

१.खरीप २०२४ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या सर्व शेतकऱ्यांना सरसक-ट आणि तात्काळ पीकविमा रक्कम देण्यात यावी.

२.शासनाकडून जाहीर झालेली अतिवृष्टीची नुकसान भरपाई तत्काळ शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात यावी.

३.रब्बी हंगाम २०२३ साठी फक्त काही शेतकऱ्यांना विमा रक्कम मिळालेली आहे. ही रक्कम सर्व पात्र शेतकऱ्यांना सरसकट देण्यात यावी.

शोक, संताप, निषेध... डोंबिवली, अमरावती, मालेगाव, परभणीत बंद

■मुंबई। प्रतिनिधी :

काश्मीरच्या पहलगाममध्ये मंगळवारी दहशतवाद्यांनी केलेल्या नृशंस हल्ल्यात २६ लोकांनी जीव गमावला असून त्यामध्ये भारतीयांसह परदेशी पर्यटकांचाही समावेश आहे. धर्म विचारून दहशतवाद्यांनी पर्यटकांवर गोळ्या झाडल्या.या हल्ल्यात महाराष्ट्रातील ६ जणांचा मृत्यू झाला असून त्यामध्ये डोंबिवलीतील तिघे, पुण्यातील २ तर नवी मुंबईतील एकाचा समावेश आहे. यामुळे महाराष्ट्रासह संपूर्ण देशात संतापाची लाट उसळली आहे. या हल्ल्यानंतर भारताने कठोर पावलं उचलली असून पाच प्रमुख निर्णय घेत पाकिस्तानची कोंडी केली आहे,

या हल्ल्याच्या निषेधार्थ आज राजकीय पक्ष आणि सामाजिक संस्था यांनी डोंबिवली बंद पुकारला असताना आता या बंदमध्ये शाळेने देखील सहभाग घेतला आहे. डोंबिवलीतील टिळकनगर शिक्षण प्रसारक मंडळाच्या सर्व अस्थापना या बंदमध्ये सहभागी होणार आहेत. त्याच पार्स्वभूमीवर आज शाळेची असलेली परीक्षा रद्द करत पुढे ढकलण्यात आली आहे. ही परीक्षा शनिवार दिनांक २६/०४/२०२५ रोजी वेळापत्रकात नमूद केलेल्या वेळेनुसार होतील. याची सर्व विद्यार्थी आणि पालकांनी नोंद घ्यावी, असे आव्हान शाळेत प्रशासनाकडून केले जातात

अमरावती बंदचीही हाक

जम्मू काश्मीर येथील पहलगाम येथे झालेल्या आतंकवादी हल्ल्याच्या निषेधार्थ शुक्रवारी अमरावतीशहर बंद व निषेध आंदोलन करण्यात येईल. विश्व हिंदू परिषद, बजरंग दल व सर्वच हिंदुत्ववादी संघटनाच्या वतीने बंदचं आवाहन करण्यात आलं आ-हे. अमरावतीच्या राजकमल चौकात हिंदुत्ववादी संघटनांच उद्या सकाळी दहा वाजता आंदोलन होईल.

मालेगावही राहणार बंद

पहेलगाम येथील घटनेच्या निषेधार्थ आज मालेगाव बंदची हाक देण्यात आली आहे. विविध सामाजिक संघटनांकडून आंदोलने देखील होणार आहेत. काश्मीरच्या पहेलगाम भागात झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा निषेध व्यक्त करण्यासाठी व या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या २६ निरपराध नागरिकांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी आज मालेगाव बंदची हाक देण्यात आली आहे. बंदमध्ये सहभागी होण्याचं छत्रपती संघटना कडून नागरिकांना आवाहन करण्यात आलं आहे.

दरम्यान पहलगाममध्ये झालेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्यात डोंबिवलीच्या तीन नागरिकांचा मृत्यू झाल्याने संपूर्ण शहर शोकमग्न झालं आहे. अतुल मोने, संजय लेले आणि हेमंत जोशी या तीन डोंबिवलीकतरांचा काश्मीरमध्ये हकनाक बळी गेला असून त्यांच्यावर काल शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. या हल्ल्याच्या तीव्र निषेधार्थ आज डोंबिवली बंदची हाक देण्यात आली आहे. सर्व पक्ष, व्यापारी, शाळा, आणि नागरिक यामध्ये सहभागी झाले आहेत. काल हल्ल्यात मृत्युमुखी पडलेले तिघा पर्यटकांवर डोंबिवलीत अंत्यसंस्कार करण्यात आले. असून आज सकाळ पासून डोंबिवलीतील दुकाने, हॉटेल्स, व्यावसायिक आस्थापना बंद आहेत. शहरातील विविध भागांत निषेध बॅनरबाजी लावण्यात आले असून नागरिक, व्यापारी, राजकीय पक्ष आणि सामाजिक संस्था मोठ्या संख्येने सहभागी झाल्या आहेत.

सरकारने घेतला गेम चेंजर निर्णय! मत्स्य व्यावसायिकांना शेतकऱ्यांचा दर्जा

■मुंबई। प्रतिनिधी :

महाराष्ट्र सरकारने एक गेम चेंजर ठरणारा निर्णय घेतला आहे. मत्स्य व्यावसायिकांना शेतक-यांचा दर्जा देण्यात आला आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा मोठा निर्णय घेण्यात आला. राज्यातील मच्छीमार बांधवासाठी मोठा दिलासा देणारा हा निर्णय आहे. लाखो मत्स्य व्यावसायिकांना याचा फायदा होणार आहे. विविध सरकारी योजनांचा लाभ मत्स्य व्यावसायिकांना मिळणार आ-हे. मत्स्य व्यवसायाला कृषी दर्जा देण्याचा महत्वाचा निर्णय सरकारने घेतला आहे. मत्स्य आणि बंदरे मंत्री नितेश राणे यांनी या योजनेची घोषणा केली. आपलं राज्य येत्या काही वर्षात पहिल्या तीन क्रमांकावर येऊ शकत. मत्स्य व्यावासायिकांना दर्जा कुणीही दिलेला नाही. राज्यांनी कृषीच्या सवलती दिल्यामुळे मत्स्य व्यवसायात वाढ झालेली आहे. आजच्या एका निर्णयामुळे ४ लाख ६३ हजार मच्छीमारांना लाभ मिळणार आहे असे नितेश राणे म्हणाले. सरकारच्या या निर्णयामुळे मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होणार आहे. सर्व मच्छीमारांना याचा लाभ होणार आहे. सर्व योजनाचा लाभ मच्छीमार बांधव घेऊ शकतात असेही नितेश राणे म्हणाले. मत्स्यव्यवसायाला कृषीचा दर्जा मिळावा अशी मागणी अनेक वर्षांपासून मच्छीमार बांधव करत होते. अखेर ही मागणी सत्यात उतरली आहे. शेततळी, गोड्या पाण्यातील मत्स्यशेतीची निर्मिती करून शेतकरी उत्पादन वाढवण्याचा प्रयत्न करतात. मात्र उधाण, महापूर यांसारख्या नैसर्गिक आपत्तींमुळे त्यांचे मोठे नुकसान होते.

५ नक्षलवाद्यांचा खात्मा, घटनास्थळी १ हजार नक्षलवादी असल्याची माहिती... ड्रोनद्वारे चकमकीवर नजर

■छत्तीसगड। प्रतिनिधी :

छत्तीसगडमधील बिजापूर जिल्ह्यातील कॅरेगुट्टा जंगल परिसरात झालेल्या चकमकीत पाच नक्षलवादी ठार झाले आहेत. तर घटनास्थळी सुमारे १ हजार नक्षलवादी उपस्थित असल्याची माहिती समोर येत आहे. ही कारवाई जिल्हा राखीव रक्षक दल, बस्तर फायटर्स, विशेष टास्क फोर्स, राज्य पोलीस दल, केंद्रीय राखीव पोलीस दल आणि कोब्रा बटालियन यांच्या

संयुक्त पथकांनी राबवली असून, गुप्तचर माहितीच्या आधारे ही मोहीम आखण्यात आली.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, मोस्ट वॉन्टेड नक्षल कमांडर हिडमा आणि बटालियन प्रमुख देवा याच्यासह इतर महत्त्वाच्या नक्षल नेत्यांची हालचाल या भागात असल्याची माहिती सुरक्षा यंत्रणांना मिळाली होती. त्यानंतर व्यापक पातळीवर ही कारवाई सुरु करण्यात आली. कालपासून सुरू असलेली ही चकमक नडपल्लीच्या पहाडी परिसरात जोरात सुरू असून, सतत गोळीबाराचा आवाज कानावर येत आहे. ड्रोनच्या माध्यमातून चकमकीवर सुरक्षा दल सतत लक्ष ठेवून आहे.

१ हजार नक्षलवाद्यांना घेरले

आता पर्यंत या चकमकीत घटनास्थळी पाच नक्षलवाद्यांचे मृतदेह सापडले असून, अजून काही जखमी नक्षलवाद्यांची उपस्थिती नाकारता येत नाही. परिसरात सध्या मोठ्या प्रमाणात शोधमोहीम सुरू आहे. दरम्यान, तीन राज्यांतील २० हजारांहून अधिक सुरक्षा दलाचे जवान या कारवाईत सहभागी असून, सुमारे १ हजार नक्षलवाद्यांना घेरण्यात आले आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे.

बिजापूर जिल्ह्यातही नक्षलवाद्यांशी चकमक

बिजापूर जिल्ह्यात नक्षलवाद्यांशी सुरक्षा दलांची मोठी चकमक झाली आहे. उसूर पोलीस ठाणे क्षेत्रातील गलगम-नडपल्ली परिसरातील डोंगराळ भागात ही चकमक सुरू असून, परिसरात सतत गोळीबाराचा आवाज ऐकू येत आहे. याच दरम्यान, एक आयईडी स्फोट झाला असल्याची माहितीही समोर आली आहे. या भागात नक्षलवादी लपून बसल्याची शक्यता गृहीत धरून सुरक्षा दलांनी मोहीम तीव्र केली असून, परिसरात उच्च दक्षता पाळली जात आहे.

संभाजीनगरची महिला दीड महिना डिजिटल अरेस्ट, दीड महिन्यात ६१ लाखांवर डल्ला

कशी झाली फसवणूक?

४ मार्च रोजी रिना नंदापूरकरांना भामट्यांचा फोन आला होता. यावेळी त्यांनी सीबीआयचा अधिकारी असल्याचे सांगितले. रिना यांच्या आधारकार्डचा गैरवापर झाल्याचा बनाव केला. वय जास्त असल्याने डिजिटल अरेस्ट करत असल्याचं सांगितलं. २ टप्प्यात रिना यांच्या खात्यावरील पैसे त्यांनी काढून घेतले. सुरुवातीला ४५ लाख खात्यावरून काढून घेण्यात आले. त्यानंतर ९.५ आणि ५.५ लाख असे एकूण ६१ साथ लुटले. पैसे परत न झाल्याने अखेर महिलेने पोलिसात तक्रार देण्यात आली.

■छत्रपती संभाजी नगर। प्रतिनिधी :

सायबर भामट्यांनी आता डिजिटल अरेस्टद्वारे फसवणूक करण्याचं सत्र सुरू केलं आहे. अनेकजण या डिजिटल अरेस्टला बळी पडतायत. संभाजीनगरमधील एका ५५ वर्षीय महिलेला डिजिटल अरेस्टमुळे ६१ लाखांचा गंडा घालण्यात आला आहे. त्यामुळे नागरिकांनी आताच सावध होण्याची गरज आहे.

गेल्या काही दिवसात डिजिटल अरेस्टचे प्रकार वाढत चाललेत. या डिजिटल अरेस्टबाबत नागरिकांमध्ये जागरुकता निर्माण करण्याचेही प्रयत्न सुरू आहेत, मात्र तरि-

ही अनेकजण या डिजिटल अरेस्टचे बळी ठरतायत. छत्रपती संभाजीनगरमधील एका ५५ वर्षीय महिलेला डिजिटल अरेस्टच्या नावाखाली सायबर भामट्यांनी लुटलं आ-हे. उल्कानगरीत राहणा-या रिना नंदापूरकर यांची ६१ लाखांची फसवणूक झालीये. सीबीआयचा अधिकारी असल्याचं सांगत सायबर भामट्यांनी त्यांना लाखोंचा गंडा घातला आहे. या दीड महिन्याच्या कलाधीत रीना यांना घरातून बाहेर पडण्याची आणि कुणाशीही बोलण्याची परवानगी नव्हती.

डिजिटल अरेस्ट असा कोणताच प्र-कार नसून जर तुम्हाला असा कोणता फोन आल्यास संपर्क साधण्याचं आवाहन पोलिसांनी केलं आहे. डिजिटल अरेस्टबाबत जनजागृती केली जाते आहे. मात्र तरिही असे प्रकार वारंवार घडतायत. त्यामुळे डिजिटल अरेस्टना बळी पडू नका. या प्रकाराबाबत सावध राहण्याची अधिक गरज आहे.

मुंबईत १०० फूट खोलीवर बांधलं जातंय नवीन स्थानक शहराच्या मधोमध धावणार बुलेट ट्रेन

दरम्यान मुंबईत झालेल्या पत्रकार परिषदेत केंद्रीय मंत्रिमंडळाने महाराष्ट्राशी संबंधित रेल्वे प्रकल्पांसाठी १ लाख ७३ हजार कोटींना मंजुरी दिली असल्याची माहिती अश्विनी वैष्णव यांनी दिली होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह झालेल्या संयुक्त पत्रकार परिषदेत अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं होतं की, ''आतापर्यंत महाराष्ट्राशी संबंधित प्रकल्प ज्यामधे बुलेट ट्रेन, कॉरिडोअर्स आणि स्थानकांचा पुनर्विकास यासाठी १ लाख ७३ हजार कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. महाराष्ट्राशी संबंधित प्रकल्पांची किंमत १ लाख ७३ हजार ८०४ कोटी आहे''.

■रायगड। प्रतिनिधी :

मुंबईत सध्या ठिकठिकाणी मेट्रोचं जाळ उभारण्याचं काम सुरु आहे. अनेक ठिकाणी काम प्रगतीपथावर आहे. केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी व्हिडीओ शेअर केला असून या माध्यमातून मुंबई बुलेट ट्रेन स्थानकाचं काम सध्या कुठपर्यंत पोहोचलं आहे याची माहिती दिली आहे. आपल्या एक्स अकाऊंटवर त्यांनी व्हिडीओ शेअर केला असून, पोस्टमध्ये लिहिलं आहे की, ''मुंबईचं बुलेट ट्रेन स्थानक जमिनीच्या १०० फूट खाली आकार घेत आहे''.

२०२५-२६ केंद्रीय अर्थसंकल्पाबद्दल बोलताना त्यांनी सांगितलं की, महाराष्ट्रासाठी २३ हजार कोटी वितरित करण्यात आले असल्याची माहिती दिली. ''अशा मोठ्या प्रोजेक्टसाठी दरवर्षी निधीची गरज आ-हे. यामुळेच तुम्ही पाहिलं तर यावेळच्या अर्थसंकल्पात तशी तरतूद दिसेल. यासाठी २३ हजार ७७८ कोटींची तरतूद आहे,'' असं ते म्हणाले होते.

मागील युपीए सरकारवर टीका करताना त्यांनी म्हटलं की, त्यांनी महाराष्ट्राला फक्त १ हजार कोटी रुपये दिले होते, ज्यामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वातील केंद्रीय मंत्रिमंडळाने २० पटींनी वाढ केली. ''जेव्हा युपीए सरकार होतं, तेव्हा महाराष्ट्राला ११७१ कोटी मंजूर करण्यात आले होते, पण आता मोदींनी २० पट जास्त दिलं आ-हे. यामुळे रेल्वेच्या नेटवर्कमध्ये फार मोठा बदल होईल,'' असं ते म्हणाले होते.

जळगावात खून का बदला खूनसे... बुलेट आडवी लावली, कपाळाच्या मधोमध गोळी घातली

■जळगाव। प्रतिनिधी :

गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्रातील गुन्हेगारीच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत आहे. त्यातच आता जळगाव जिल्ह्यातील एका ४० वर्षीय तरुणाची सिनेस्टाईल पाठलाग करुन गोळ्या झाडून हत्या करण्यात आली. गोपाळ सोमा मालचे असे मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव आहे. या घटनेनंतर आरोपीला अटक करण्यात आली आहे. राहुल कोळी असे आरोपीचे नाव असून त्याच्याकडून धक्कादायक माहिती

समोर आली आहे.

नेमकं काय घडलं?

जळगावातील धरणगाव तालुक्यातील विहीर फाट्याजवळ मंगळवारी रात्री सिनेस्टाईल पाठलाग करून एका ४० वर्षीय तरुणाची गोळ्या झाडून हत्या करण्यात आली. या घटनेनंतर आरोपी राहुल ज्ञानेश्वर कोळी हा आरोपी स्वतःहून धरणगाव पोलीस ठाण्यात हजर झाला. यानंतर त्याने पोलिसांना घटनेची सर्व माहिती दिली. गोपाळ मालचे हे त्यांच्या वाहनाने जात असताना वाकट-ुकी फाट्याजवळ राहुल कोळी याने त्यांच्यावर गोळीबार केला. यावेळी डोक्यात गोळी लागल्याने गोपाळ यांचा जागीच मृत्यू झाला. राहुल कोळीने त्याच्याकडील गावठी पिस्तुलातून चार राऊंड फायर केले. पोलिस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी यांनी दिलेल्या माहितीनुसार, गोपाळ मालचे याने २०१० मध्ये राहुल कोळीचे वडील ज्ञानेश्वर कोळी यांचा खून केला होता. वडिलांच्या खुनाचा बदला घेण्यासाठी राहुल कोळीने गोपाळ मालचे यांचा पाठलाग करून त्यांच्यावर गोळ्या झाडल्या. यात त्यांचा मृत्यू झाला. दरम्यान, या घटनेनंतर परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. पोलिसांनी गावात मोठा बंदोबस्त तैनात केला आहे. आरोपी राहुल कोळी याला अटक करण्यात आली आहे. याप्रकरणी धरणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

वडिलांच्या खुनाचा बदला घेण्यासाठी...

गेल्या काही दिवसांपासून राहुलच्या मनात वडिलांच्या खुनाचा बदला घेण्याची आग धगधगत होती. मंगळवारी रात्री आठच्या सुमारास गोपाळ मालचे कुटुंबियांसोबत घरी परत येत होते. त्यावेळी राहुलने विहीर फाटा येथे त्यांच्या कारसमोर आपली बुलेट लावली. रस्त्यात उभी असलेली बुलेट गोपाळ मालचे गाडीतून खाली उतरले. त्यावेळी राहुलने गोपाळच्या कपाळाच्या मधोमध नेम धरून गोळी झाडली. ज्यात त्याचा जागीच मृत्यू झाला.

संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

आणखी एका स्ट्राईकची गरज

जम्मू-काश्मीरच्या अनंतनाग जिल्ह्यात मंगळवारी मृत्यूचे थैमान पाहायला मिळाले. आपल्या कुटुंबकबिल्यासह निसर्गरम्य पहलगाममध्ये सुट्टीचा आनंद लुटायला आलेल्या पर्यटकांना साश्रू नयनांनी परतावे लागले. दहशतवाद्यांच्या अमानुषतेचे २८ जण बळी ठरले. त्यात २ स्थानिक, २ परदेशी नागरिक होते. दुर्दैवाने, या मृतांमध्ये आपल्या महाराष्ट्रातील ६ नागरिकही आहेत. कोणाचे नुकतेच लग्न झाले होते, तर काहीजण मुलांच्या परीक्षा आटोपल्याने जम्मू-काश्मीरला गेले होते. सर्वकाही आनंदात असतानाच पहलगाममधील बैसरन खोऱ्यात जवळपास ६-७ अतिरेकी त्यांच्यासमोर काळ बनून उभे ठाकले. त्यांनी या पर्यटकांमधील केवळ पुरुषांनाच लक्ष्य केले. वास्तवात, जन्म आणि मृत्यूला कोणताही धर्म नसतो. तो जीव जसजसा मोठा होतो, तसतसा त्याला धर्म आणि जात चिकटत जाते. पण या अतिरेक्यांनी पुरुष पर्यटकांच्या धर्माची खातरजमा केली. काहीजणांना 'कलमा पढायला' लावला आणि त्यानंतर त्यांच्यावर गोळ्या झाडण्यात आल्या. माणसापेक्षा धर्म कसा मोठा असू शकतो? पण जेव्हा तुम्ही एखाद्या चुकीच्या विचाराच्या आहारी जाता, तेव्हा सद्सद्विवेक बुद्धी अस्तित्वातच राहात नाही. पहलगाममधील अतिरेक्यांनी केलेला अंदाधुंद गोळीबार हेच दर्शविते. जम्मू आणि काश्मीरमधून ५ ऑगस्ट २०१९ रोजी कलम ३७० हटविल्यानंतर झालेला बहुदा हा पहिलाच मोठा हल्ला आहे. केंद्र सरकारच्या याच निर्णयानंतर दी रेझिस्टन्स फ्रंट (टीआरएफ) ही संघटना समोर आली. टीआरएफ हा पाकिस्तानस्थित लष्कर-ए-तैयबाचा छुपा तंझीम म्हणजेच इस्लामिक दहशतवादी गट आहे. पण केंद्र सरकारच्या या निर्णयामुळे काश्मीरमधील नव्या अंतर्गत प्रतिकाराची सुरुवात म्हणून टीआरएफ अस्तित्वात आल्याचे चित्र रंगवण्यात आले आहे. पाकिस्तानकडून या संघटनेला अर्थसहाय्य केले जाते. एकूणच भारतातील दहशतवादी कारवायांमध्ये पाकिस्तानचा सहभाग असल्याचे वारंवार स्पष्ट आहे. काश्मीरमध्ये अशांतता निर्माण करण्यासाठी पाकिस्तान कायम प्रयत्नशील असतो. याच उद्देशाने सातत्याने भारतात घुसखोरीचे प्रयत्न सुरूच आहेत. अतिरेक्यांबरोबरच अधिकाधिक शस्त्रास्त्रे आणि दारुगोळा भारतीय हद्दीत पाठविण्याचे धोरणही पाकिस्तानी सैन्य अवलंबत आहे. त्यामुळेच घुसखोरी करण्याचा प्रयत्न करणाऱ्या अतिरेक्यांकडे अत्याधुनिक शस्त्रे सापडली आहेत. पण पाकिस्तानने कायमच या घटनांशी आपला काहीही संबंध नसल्याचे दाखवण्याचा प्रयत्न केला. मुंबईवरील २६/११च्या हल्ल्यातील अतिरेकी आपल्या देशातील असतानाही त्याचा इन्कार पाकिस्तानने केला. याप्रकरणी भारतात फासावर चढवण्यात आलेल्या कसाबचे घर पाकिस्तानातच असल्याचा व्हिडीओही व्हायरल झाला होता. आताही पहलगाममध्ये विदेशी बनावटीची शस्त्रे वापरण्यात आल्याचे सांगण्यात येते. एनआयएच्या सुरुवातीच्या तपासात या हल्ल्यात पाकिस्तानचा सहभाग असल्याचे पुरावे समोर येऊ लागले आहेत. बैसरनमधील शोधमोहिमेदरम्यान सुरक्षा यंत्रणांना ५० ते ७० पुंगळ्या मिळाल्या. त्या अमेरिकन बनावटीच्या एम-फोर कार्बाईन असॉल्ट रायफल तसेच एके-४७ च्या असल्याचे सांगण्यात येते. त्यातही एके-४७ च्या गोळ्या चीन बनावटीच्या आहेत. सध्या पाकिस्तानची आर्थिक स्थिती खूपच दयनीय आहे. अशा परिस्थितीत त्याचा जवळचा मित्र असलेल्या चीनचीच मदत, अशा कारवायांसाठी मिळत असते, हे उघड झाले आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावरील भारताचे वाढते प्रस्थ आणि त्याच्या प्रगतीच्या घोडदौडीमुळे चीनदेखील अस्वस्थ आहे. त्यामुळे एकीकडे एलएसीवर त्याची आगळीक सुरू असतानाच, पाकिस्तानच्या अतिरेकी कारवायांनाही हवा देण्याचे काम सुरू आहे. कारगिल असो, उरी असो, पुलवामा असो किंवा आताचे पहलगाम असो या सर्व घटनांमध्ये भारतीय गुप्तचर विभागाचे अपयशही समोर आले आहे. कारगिलमधील पाकिस्तानी सैन्याच्या घुसखोरीच्या वेळी संरक्षण मंत्रालयाच्या विविध विभागांमध्ये असलेला समन्वयाचा अभाव समोर आला होता. त्यामुळे मोदी सरकार सत्तेत आल्यावर मनोहर पर्रिकर यांनी संरक्षणमंत्री पदाची सूत्रे हाती घेतल्यावर सर्वच विभागांचे सुसूत्रीकरण करण्याचा प्रयत्न केला. पण उरी आणि पुलवामा हल्ल्याच्या वेळी हे अपयश अधोरेखित झाले. सुदैवाने गेली सहा वर्षं जम्मू-काश्मीरसह देशभरात कोणतीही मोठी घटना घडलेली नाही. त्यामुळेच पुन्हा एकदा या समन्वयामध्ये शिथिलता आली की काय, असा प्रश्न उपस्थित होतो. उरी येथे १८ सप्टेंबर २०१६ रोजी अतिरेक्यांनी केलेल्या हल्ल्यात १९ जवान शहीद झाले होते. भारताने बरोबर १० दिवसांनी सर्जिकल स्ट्राईक करून हिशोब चुकता केला होता. पाकव्याप्त काश्मीरमध्ये घुसून ३८ दहशतवाद्यांचा खात्मा करत त्यांचे तळ उद्ध्वस्त केले. तर, १४ फेब्रुवारी २०१९ ला पुलवामा येथे सीआरपीएफच्या ताफ्यावर झालेल्या अतिरेकी हल्ल्यात ४० जवानांचा मृत्यू झाला होता. त्यानंतर लगेच २६ फेब्रुवारी २०१९ रोजी भारतील सैन्याकडून बालाकोटमध्ये एअर स्ट्राईक करून अतिरेक्यांचे तळ उद्ध्वस्त केले होते. पंतप्रधानपदावर विराजमान होण्यापूर्वी नरेंद्र मोदी यांनी एका कार्यक्रमात म्हटले होते की, दहशतवादी कारवायांनंतर पाकिस्तानला 'लव्ह लेटर' पाठवणे बंद केले पाहिजे. त्यांना त्यांच्या भाषेतच उत्तर दिले पाहिजे. त्यांच्याच पतंप्रधानपदाच्या कारकीर्दीत सर्जिकल स्ट्राईक आणि एअर स्ट्राईक करून 'जशास तसे' उत्तर पाकिस्तानला देण्यात आले. आताही मोदी सरकारकडून सर्वसामान्यांची तीच अपेक्षा आहे, पण हा स्ट्राईक अमेरिकेने ९/११ नंतर अफगाणिस्तानवर केलेल्या हल्ल्याप्रमाणे असावा. जेणेकरून त्या देशाची खुमखुमी तिथेच ठेचली जाईल.

एसटी ही सरकारी सेवा, केवळ प्रवासी कमी यामुळेच डबघाईस आली. त्यावर महामंडळातील अनागोंदी, व्यवस्थापकीय कौशल्याचा अभाव, नावीन्य शोधण्यातील अडचणी, राजकारणातील अपरिहार्यतेमुळे युती आघाडीच्या राजकारणात राजकीय व्यवस्था म्हणून केल्या जाणाऱ्या नियुक्त्या आणि सगळ्याच्या शिरोधारी असणारा भ्रष्टाचार या सगळ्यामुळे एसटी तोट्यात जाते आहे. गरज आहे ती नि:स्वार्थीपणे अराजकीय पद्धतीने या अतिशय महत्त्वाच्या ठरलेल्या महाराष्ट्राच्या जीवनवाहिनीला वाचवण्याची.

पुण्याहून १९४८मध्ये अहमदनगरला पहिली बस सुरू झाली. १७,००० बसेस, २४७ डेपो, ३२ विभागीय कार्यशाळा आणि तीन केंद्रीय कार्यशाळा नवीन बसेस बांधण्यासाठी आणि त्यांच्या मोठ्या दुरुस्ती आणि देखभालीसाठी आहेत, १२,००० कर्मचारी आणि सुमारे ७० लाख नागरिक दररोज या सेवेचा वापर करतात. दरवर्षी १५ एप्रिल ते १५ जून हा एसटीचा गदीर्चा हंगाम म्हणून ओळखला जातो. वर्षभरातील सर्वाधिक उत्पन्न या काळात महामंडळाला मिळते. शाळेच्या सुट्ट्यांमुळे बसगाड्यांची उपलब्धता आणि लग्नसराईमुळे यांमुळे मोठ्या संख्येने प्रवासी एसटीने प्रवास करतात. पण गेल्या अनेक वर्षांपासून ती जागा आता गावागावात वडाप, खासगी बस, मिनी बस, रिक्षा आताशा तर ओला, उबर या खासगी टॅक्सींनी घेतली आहे. प्रवाशांची लाडकी एसटी हळूहळू तोट्यात घालवून तिला बुडवण्याचा आणि खासगी बसेस आणि खासगी पयार्यी वाहतूक पुढे आणून त्यातून एसटीला संपवण्याचा घाट घातला जातोय. सर्वसामान्य प्रवाशांनीच आता मनाचा हिय्या करून आपल्या लाडक्या एसटीला वाचवण्यासाठी पुढाकार घ्यायला हवा. राजकारण्यांना प्रत्येक विषयात त्यांचा फायदा दिसतो, त्यासाठी ते सामान्य माणसालाच वेठीस धरतात. सामान्य माणसाने आपला वापर किती होऊ द्यायचा हे ठरवण्याची वेळ आता आली आहे.

एसटीचा इतिहास प्रेरणादायी

एसटीची कहाणी एक अशी कहाणी आहे ज्याची सुरुवात झाली, तेव्हा लोकांना असे वाटले की, राज्य परिवहन (एसटी) बससेवा दोन वर्षांहून अधिक काळ टिकणार नाही. पण तसे न होता एसटीने आपले अस्तित्व स्वतःच्या जोरावर टिकवले. आज ७१ वर्षांच्या या मैलाच्या दगडावर उभे राहून, तिची ताकद स्वतःच बोलते- साधारण १८८४९ बस, एक-सव्वा लाख कर्मचारी, सुमारे ७० लाख नागरिक दररोज ही एसटी सेवा वापरतात. १९२०च्या विविध उद्योजकांनी सार्वजनिक वाहतूक संदर्भात त्यांचे कार्य सुरू केले. १९३९मध्ये मोटार वाहन कायदा अस्तित्वात येईपर्यंत, त्यांच्यावर लक्ष ठेवण्यासाठी कोणतेही नियम नव्हते आणि यामुळे अनियंत्रित स्पर्धा, अनियंत्रित भाडे वाढले. कायद्याच्या अंमलबजावणीमुळे प्रकरणांमध्ये काही प्रमाणात सुधारणा झाली. वैयक्तिक ऑपरेटरना विशिष्ट भागात परिभाषित मार्गांवर युनियन तयार करण्यास सांगितले होते. हे प्रवाशांसाठी फायदेशीर ठरले. कारण वेळापत्रक, पिक-अप पॉइंट्स, काही प्रकारचे वेळापत्रक कंडक्टर आणि निश्चित तिकीट दरांसह हे अस्तित्वात आले.

एसटीचे पहिले भाडे होते केवळ नऊ पैसे!

पुणे-नगर मार्गावर लाकडी बॉडी, कॉयर सीट असलेल्या ३० बेडफोर्ड बसेसने एसटीची सुरुवात झाली आणि भाडे नऊ पैसे होते. एसटीमध्ये अनेक बदल पाहिल्यानंतर, त्यांची आसनक्षमता मूळ ३०वरून ४५ ते ५४ पर्यंत वाढवणे, लाकडी बॉडीजच्या जागी सर्व-स्टील बॉडी आणणे आणि त्यांना अधिक मजबूत बनवणे आणि अधिक आरामासाठी कुशन सीट. नंतर, १९६० च्या दशकात, ॲल्युमिनियम बॉडीस स्टील कॉरोड्स म्हणून ओळखले जाऊ लागले. विशेषतः किनारपट्टीच्या भागात आणि रंग कोड देखील निळा आणि चांदीपासून लाल रंगात बदलला. १९५६ मध्ये अर्धवट रात्रीची सेवा सुरू करण्यात आली; सुमारे एक दशकानंतर, १९८२ च्या आशियाई खेळांमध्ये रात्रभर सेवा आणि अर्ध-लक्झरी वर्ग अस्तित्वात आला. विशेष म्हणजे, एसटी केवळ लोकांची वाहतूक करत नाही, तर पोस्टल मेल, औषधे, वर्तमानपत्रे आणि टिफिनही पुरवते. मोठ्या शहरात शिकणारी मुले. ग्रामीण भागात शेतकऱ्यांना त्यांचा माल शहरांमध्ये नेण्यास लालपरीची आजही मदत होते. रस्त्याने जोडलेल्या प्रत्येक गावात एसटी पोहोचते, मग तो रस्ता आणि ती एसटी कितीही वाईट असली तरी! 'जिथे रास्ता, दशांश एसटी' (जिथे रस्ता आहे, तिथे एसटी बस आहे) या ब्रीदवाक्यानुसार ती जगणारी आहे! तरीही खासगी व्यापाऱ्यांचा फायदा बघून एसटीच्याच मार्गावर त्यांना परवानग्या देऊन एसटीला तोट्यात ढकलले जाते. जेणेकरून त्यांचा कार्यभार हळूहळू खासगीकरण करणाऱ्यांच्या हातात सोपवता येईल; मात्र तसे होणार नाही. कारण जनतेने स्वतः साठी नेहमीच एसटीला महत्त्व दिले आहे आणि जनता एसटीचे खासगीकरण होऊ देणार नाही.

एसटी आर्थिकरीत्या डबघाईला का येते?

एसटी आर्थिकदृष्ट्या डबघाईला येण्याची मुख्य कारणे बारकाईने पाहिली, तर सरकारने एसटीला पुरेसा निधी कधीच दिला नाही. त्यामुळे कर्मचाऱ्यांचे वेतन आणि इतर खर्च भागवणे कठीण झाले. तसेच, खासगी बस कंपन्यांशी स्पर्धा वाढल्यामुळे प्रवाशांची संख्या कमी झाली. एसटीला वेळेत आणि पुरेसा निधी मिळत नाही, ज्यामुळे वेतनाची थकबाकी वाढते आणि इतर आवश्यक खर्च भागवणे कठीण होते. त्यामुळे बऱ्याचदा आपला दर वाढवावा लागतो आणि खासगी बस कंपन्यांच्या तुलनेत एसटीचे भाडे जास्त होते. यामुळेही प्रवाशांची संख्या कमी होते असे लक्षात आले आहे. एसटीला कर्मचाऱ्यांचे वेतन, भविष्य निर्वाह निधी (पीएफ), उपदान (ग्रॅच्युईटी) आणि इतर देणी भरण्यासाठी पुरेसा निधी मिळत नाही. भाडेवाढ करूनही एसटीचे उत्पन्न वाढले नाही. एसटीच्या आर्थिक स्थितीची समस्या अनेक कारणांनी निर्माण झाली आहे, ज्यात सरकारी निधीची कमतरता, खासगी बस कंपन्यांशी स्पर्धा आणि कर्मचाऱ्यांची थकबाकी यांचा समावेश आहे. एसटीची आर्थिक परिस्थिती डबघाईला आल्याने एसटी कर्मचाऱ्यांची सर्व देणी थकली आहेत. एसटी महामंडळाच्या कर्मचाऱ्यांची आणि महामंडळाची सरकारकडून येणारी प्रतिपूर्तीची अनेक देणी निधी अभावी थकली आहेत. ही देणी चुकती करण्यासाठी साधारण ५००० कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेची आवश्यकता आहे. या थकीत देण्यामुळे महामंडळ आर्थिक संकटात सापडले आहे. त्याचा एसटीच्या उत्पन्नवाढीवर सुद्धा परिणाम झाला आहे. त्याचप्रमाणे कर्मचाऱ्यांची देणी प्रलंबित असल्याने कामगारांमध्ये असंतोष निर्माण होत आहे. सरकारकडून न प्राप्त झालेली गेल्यावर्षीची तुटीची रक्कम १००० कोटी रुपये इतकी आहे. ज्यात थकीत महागाई भत्ता रक्कम १२० कोटी रुपये, पीएफ थकीत रक्कम ११०० कोटी रुपये, उपदान म्हणजेच ग्रॅच्युईटी थकीत रक्कम ११५० कोटी रुपये, एसटी बँक थकीत रक्कम १५० कोटी रुपये, एलआयसी थकीत रक्कम १० कोटी रुपये, रजा रोखीकरण थकीत रक्कम ६० कोटी रुपये, वैद्यकीय प्रतिपूर्ती थकीत रक्कम १० कोटी रुपये, डिझेल थकीत रक्कम १०० कोटी रुपये, भांडार देणी थकीत रक्कम ८० कोटी रुपये, पुरवठादार कंपनी थकीत देणी रक्कम ५० कोटी रुपये, अपघात सहाय्यता निधी थकीत रक्कम ३ कोटी रुपये अशा कोटीच्या कोटी उड्डाणांचा समावेश आहे. प्रत्यक्षात महामंडळ पूर्णपणे तोट्यात आहे.

एसटी महामंडळाला खर्च झेपत नाही

एसटी महामंडळात मोठ्या प्रमाणात कर्मचारी आहेत आणि त्यांचे वेतन हा मोठा खर्च आहे. डिझेल आणि इतर इंधनावर होणारा खर्च देखील मोठा असतो. कारण एसटी महामंडळाकडे मोठ्या प्रमाणात बस आहेत. दुरुस्ती, देखभाल, टायर आणि इतर आवश्यक वस्तू खरेदी करणे, इत्यादी खर्चाचा समावेश त्यात होतो. महामंडळाने काही महिन्यांपूर्वी भाडेवाढ केली आहे, जी खर्च वाढण्यास कारणीभूत झाली. एसटी महामंडळाने २५ जानेवारी २०२५ पासून भाडेवाढ केली आहे. ६ किलोमीटर प्रवासाचे भाडे पूर्वी ८.७० रुपये होते, ते आता १०.०५ रुपये झाले. इतर सेवा प्रकारांसाठी देखील भाडे वाढले. या भाडेवाढीमुळे प्रवासाचा खर्च वाढला. एसटी महामंडळ वेगवेगळ्या सवलत योजना देखील पुरवते. जसे की, ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी आणि इतर लोकांसाठी सवलत. या योजनांमुळे काही प्रवाशांना कमी भाड्यात प्रवास करता येतो. महिलांना अर्ध्या दरात प्रवास करता येतो. सवलत आणि मोफत प्रवास योजना दिसायला बऱ्या वाटत असल्या, तरी त्यामुळे एसटी अधिक तोट्यात जाते.

एसटीला वाचवायचंय? मग हे कराच...

खासगी बससेवाचा वापर मोजका करा, एसटी आवाराच्या आसपास खासगी बस दिसल्या की, त्यांच्यावर कडक कारवाई करा, एसटीतील कर्मचाऱ्यांना योग्य सवलती द्या आणि त्यांना प्रशिक्षण द्या, एसटी सामान्य माणसांची आहे, याची लोकप्रियता वाढवण्यासाठी प्रचार-प्रसार करण्याकडे कल ठेवा. विविध शैक्षणिक सहली आणि खासगी कार्यक्रमांना एसटीच भाड्याने घ्यायला लावा. एसटीचा दर्जा सुधारून सर्व बस वातानुकूलित करा. या गोष्टी हळूहळू होतील. पण जनतेने ठरवलं तर एसटी महामंडळाला खड्ड्यातून आणि तोट्यातून बाहेर काढणे फारसे कठीण नाही. गरज आहे ती आत्मविश्वासाने त्यास वर उचलण्यासाठी हातभार लावण्याची आणि हो, राजकारण्यांना आणि युनियनबाजी करून नेतेगिरी करणाऱ्यांना आधी उचलून फेका, तरच तुमची लाडकी एसटी खड्ड्यातून वर येईल आणि पुन्हा जोमाने आणि वेगाने धावेल! बघा पटतंय का?

कसलं जलजीवन? दुष्काळ आणि सरकारचं साटंलोटंच!

प्रत्येक उन्हाळा म्हणजे गावागावतली पाण्यासाठीची लढाई. डोक्यावर हंडे घेऊन उन्हातान्हात चालणाऱ्या महिला, तासनतास रांगेत उभी राहणारी मुलं, जीवघेण्या विहिरीत उतरुन ओंजळीनं पाणी भरणारी एखादी आदिवासी महिला आणि कुठल्यातरी गावात पाणी भरताना विहिरीत पडून प्राण गमावलेली एखादी आई... हे चित्र आता इतकं सामान्य झालंय की, ते पाहून सरकारही आता खडबडून जागं वगैरे होत नाही. कारण सरकारनं ग्रामीण भागातील पाण्याला कधी प्राधान्यच दिलं नाही.

शहरांमध्ये मेट्रो धावते, उड्डाणपूल उभे राहतात, रस्ते चमकतात. त्यासाठी कोटींचं बजेट ठरतं. पण तोच गावकरी, उभी केली, तो प्रत्येक उन्हाळ्यात दिसतो. सरकारच्या दृष्टीने शहर म्हणजे प्रगती हजारो ज्याने ही सत्ता विहिरीपाशी रांगेत उभा आणि गाव म्हणजे फक्त मतांचा एक आकडा. हीच गावं जेव्हा निवडणुकीत मतदानासाठी रांगेत उभी राहतात, तेव्हा त्याला 'लोकशाहीचा उत्सव' म्हणतात; पण त्याच गावांच्या पाणी योजना मात्र कधीच 'कार्यवाही'पर्यंत येत नाहीत.

त्यामुळेच आजही महाराष्ट्रातला ग्रामीण भाग तहानलेला दिसतो. एकविसाव्या शतकात जग चंद्रावर वस्ती करू पाहत असताना, आपल्याच राज्यात हजारो गावे अशी आहेत जिथे अजूनही महिलांना एक हांडा पाणी मिळवण्यासाठी कोसो दूर अंतरावर जावं लागतं. हे चित्र दरवर्षी उन्हाळ्यात नव्यानं उभं राहतं. देशाच्या आणि राज्याच्या सत्ताधीशांना याचं काहीच वाटत नाही. दुसरीकडे आश्वासनं मात्र सत्तेच्या बाथटबमध्ये वर्षानुवर्षं शाब्दिक अंघोळ करत बसलेली दिसतात.

पाणी ही जीवनाची गरज आहे, हे जागतिक सत्य आहे. पण ग्रामीण भागासाठी सरकार अजूनही पाण्याकडे 'गरज' म्हणूनही पाहत नाही. केंद्र सरकार, राज्य सरकार, त्यांच्या योजनांच्या रंगीबेरंगी पत्रकांवर आणि उद्घाटनाच्या भाषणांमध्ये जे काही दाखवतं, ते केवळ ढोंग असतं. हजारो कोटींच्या पाणीपुरवठा योजनांचा हिशोब विचाराल तर फाईलींमध्ये संपलेला निधी आणि जमिनीवर ओसाड पडलेली नळपाणी योजना दिसते.

सुरगाणा तालुक्यातील अलंगुण गावाचं उदाहरण इथं मासलेवाईक ठरतं. या मतदारसंघात जे. पी. गावित हे तब्बल सात वेळा आमदार होते. तरीही हा तालुका दुष्काळाच्या गर्तेतून बाहेर पडू शकला नाही. या मतदारसंघात अनेक ठिकाणी बंधारे बांधण्याचा अयशस्वी प्रयत्न झाला. उतार असल्यामुळे पाणी टिकत नसल्याचा दावा प्रशासनाकडून केला गेला.

मात्र गावित यांच्या अलंगुण गावात मात्र आश्चर्यकारकरित्या चार बंधारे यशस्वीपणे बांधण्यात आले. त्यामुळे तालुक्यात हे एकमेव गाव आहे जे उन्हाळ्यात हिरवंगार दिसतं. जे अलंगुण गावासाठी साध्य झालं ते संपूर्ण मतदारसंघासाठी का होऊ शकलं नाही? अशा ठिकाणी तत्कालीन आमदारांसह प्रशासनाची महत्त्वाकांक्षा कुठं तेल लावत गेली होती? केवळ सुरगाणा नाही तर राज्यभरात सगळीचकडे अशी उदासीनता दिसून येते.

सत्तेवर असलेल्या कोणत्याही सरकारनं ग्रामीण भागासाठी पाणी ही कधीच 'प्राथमिकता' मानलेली नाही. आदिवासी भागांतून निवडून आलेले लोकप्रतिनिधी विधिमंडळात या प्रश्नांवर बोलतात, पण त्यांच्या गावांमध्ये महिलांना पाण्यासाठी डोंगर उतरावा लागू नये, अशी कुठलीही व्यवस्था दुर्दैवानं होत नाही. महामहिम राष्ट्रपती आदिवासी समाजातून असूनही, त्यांच्या पदाचा उपयोग ग्रामीण भागातल्या महिलांची पाण्यासाठीची पायपीट कमी करण्यासाठी झाल्याचं दिसून आलं नाही.

२०१९ साली केंद्र सरकारनं जलजीवन मिशनची घोषणा केली. त्यानंतर जणू काही ही नव्या भारताचा जलक्रांतीचा मंत्र आहे, असा प्रचार योजना करण्यात आला. 'हर घर नल से जल' हे घोषवाक्य घेऊन आलेली ही योजना, महाराष्ट्रात ग्रामीण भागातल्या लोकांच्या आशेवर पाणी फेरणारीच ठरली.

या योजनेच्या माध्यमातून ग्रामीण भागातल्या लोकांना पाण्याचा नळ नव्हे, तर नळातून कोरडी निराशाच मिळाली. पाहता पाहता योजना सुरू झाली. कागदांवर आकडे भरले गेले. दरवर्षी राज्य शासनानं अहवाल पाठवले, 'इतक्या लाख घरांना नळजोडणी झाली', 'इतके टक्के उद्दिष्टं पार केले', 'अमुक ठिकाणी प्रकल्प पूर्ण झाला', वगैरे वगैरे. पण प्रत्यक्षात जर कोणत्या एका गोष्टीचा अभाव राहिला, तर तो म्हणजे पाणी!

खेड्यापाड्यात फिरलात, तर लक्षात येतं की नळ आहे, पण त्यातून केवळ हवाच येते. काही ठिकाणी खड्ड्यांतून केवळ पाईप डोकावतात, पण त्याला नळ जोडलेले नसतात. काही ठिकाणी आठवड्यातून एकदा पाणी येतं, तर काही ठिकाणी महिन्यांनंतर. हे सगळं चालू आहे. ह्य८७ टक्के ग्रामीण घरांना नळजोडणीह्ल, अशा गगनभेदी दाव्यांच्या गजरात. जणू काही सरकारी आकडे म्हणजे सत्याचं अंतिम रूप.

राज्य शासनाच्या प्रशासकीय यंत्रणेच्या ढिसाळपणाचा आणि बेपर्वाईचा हा कळस आहे. योजनांची संकल्पना उत्कृष्ट असते, पण अंमलबजावणी करणारं प्रशासन हे गंजलेल्या खिळ्यांसारखं झालं आहे. जिथं गरज असते, तिथं हालचालच होत नाही. जलजीवन मिशनसारख्या योजनेमध्ये 'जल' हे केंद्रबिंदू असूनही, प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे गावांमध्ये अजूनही पाण्यासाठी महिलांना मैलोनमैल चालावं लागतं.

सत्तेच्या पार्ययांवर बसलेल्या अधिकाऱ्यांना या गोष्टींचं काही देणंघेणं नाही. त्यांच्या हवेलीतल्या एसी ऑफिसमध्ये कुठलं टेंडर कोणाला द्यायचं, कुठल्या ठेकेदाराकडून किती टक्के वरपायचे आणि कशा पद्धतीनं अहवालातून यशस्वीतेचे डांगोरे पिटायचे एवढंच ठरलेलं असतं. खरं सांगायचं, तर पाणीपुरवठा योजनांची अंमलबजावणी ही केवळ निवडणुकांच्या काळात ग्रामीण मतदारांना गोंजारण्याचं एक साधन झाली आहे.

नळजोडण्या दिल्या जातात, पण जलस्त्रोतांचा विचार केला जात नाही. नद्या आटलेल्या, विहिरी कोरड्या, भूजल पातळी घटलेली पण तरीही योजना यशस्वी आहे, असा गाजावाजा केला जातो. कागदावर सगळं परिपूर्ण दिसतं. सरकारी बैठकीत सादरीकरणं, स्लाइड्स, चार्ट्स, टेबल्स हे सारं 'प्रेझेंटेबल' असतं.

पण गावागावात प्रत्यक्षात परिस्थिती अतिशय बिकट असते. हे बघितल्यावर लक्षात येतं की, राज्य शासनाच्या पातळीवर पाणीपुरवठा विभाग हा केवळ एक संख्याशास्त्राचा खेळ झाला आहे. अधिकारी बदलत राहतात, नवे अधिकारी येतात, नव्यानं सर्वे होतात आणि दरवेळी नवीन टेंडर, नवीन खर्च, नवीन वायदे येतात. आज राज्यातले हजारो गावं पाण्याअभावी अडचणीत आहेत.

कोणतीही योजना यशस्वी होण्यासाठी केवळ केंद्र सरकारचा निधी पुरेसा नसतो. गरज असते नीतीनिष्ठ आणि कार्यक्षम यंत्रणेची, जी महाराष्ट्रात अभावानंच दिसून येते. जलजीवन मिशन योजना योग्य हातात असती, तर खरी जलक्रांती घडवली गेली असती.

पण शासन आणि प्रशासनातल्या बेजबाबदारपणामुळे, निविदेतील टक्केवारीच्या खाबुगिरीमुळे आणि अधिकाऱ्यांच्या निव्वळ 'पगारासाठी काम' या मानसिकतेमुळे ही योजना ग्रामीण भागासाठी अजून एक भ्रम ठरली आहे. एकूणच, अप्रामाणिक प्रशासन, लाचखोरी, टेंडर घोटाळे या सगळ्यांचं एकत्रित परिणाम म्हणजे 'जलजीवन मिशन' असं म्हटलं तर वावगं ठरू नये.

खरं तर, पाणी हा हक्क आहे. पण या हक्काला जर भीक म्हणूनच बघितलं जात असेल, तर ही व्यवस्था कधीच जनतेची होऊ शकणार नाही आणि जी व्यवस्था जनतेची होऊ शकत नाही ती कधीच लोकशाहीची म्हणवली जाऊ शकत नाही. ही व्यवस्था म्हणजे एक थट्टा आहे. ग्रामीण महाराष्ट्र आजही त्या थट्टेचा धनी आहे. महत्त्वाचं म्हणजे आज ग्रामीण भागापर्यंत पाणी पोहोचवण्यात सरकारला अपयश येत असलं तरीही काही स्वयंसेवी संस्थांनी ही अवघड कामं त्यांच्या महत्त्वाकांक्षेनं यशस्वीपणे करून दाखवली आहेत.

यात पाणी फाऊंडेशन, स्वदेश फाऊंडेशन, नाशिकमधील सोशल नेटवर्किंग फोरम, अमरावतीतील वॉटर फॉर पीपल इंडिया, सार्तायातील कोरो इंडिया, सोलापूरमधील अस्तित्व, बीडमधील युवा ग्राम विकास यांसारख्या संस्थांचा आवर्जून उल्लेख करावा लागतो. या संस्थांच्या यशामागचे घटक बघता त्यांनी नफा नव्हे तर सेवा हे ध्येय ठेवलेलं दिसतं. लोकसहभाग आणि स्वयंसेवकांची जबाबदारी निश्चित केलेली दिसते.

महत्त्वाचं म्हणजे निधीचा पारदर्शक वापर केलेला दिसतो आणि तातडीची अंमलबजावणी आणि दीर्घकालीन उपायांचा समतोल साधलेला दिसतो. या सर्व संस्थांनी शासनाच्या अपयशाला पर्याय म्हणून जनतेच्या सहकायार्ने पाण्यासारख्या मूलभूत गरजेचा प्रश्न हाताळला. या चळवळी केवळ पाणीपुरवठ्यापुरत्या मर्यादित नाहीत, तर त्या आत्मनिर्भर गावांच्या दिशेनं टाकलेलं महत्त्वाचं पाऊल आहेत.

जर या स्वयंसेवी संस्था जलसंकटावर इतक्या प्रभावीपणे काम करू शकतात, तर मग सरकार का अपयशी ठरतं? या अपयशाचं मूळ कारण म्हणजे सरकारी अधिकाऱ्यांचा हेतू स्वच्छ नाही. त्यांना अशा योजनांच्या माध्यमातून केवळ खिसे भरायचे आहेत. गावागावापर्यंत पाणी पोहोचवणं ही बाब त्यांच्या प्राधान्यक्रमात येतच नाही. दुष्काग्रस्त गावांची यादी वाढवून त्यातूनही त्यांना मलिदा वरपायचा असतो. थोडक्यात काय तर, दुष्काळ आणि सरकार यांचं साटंलोटं झालंय.

उन्हाळा आला की मीडिया दुष्काळाचे रिपोर्ट बनवते, सरकारमधले मंत्री भाषणं ठोकतात. मनोरंजन म्हणून शहरी प्रेक्षक या बाबी रस घेऊन बघतात. कोरड्या विहिरी बघून काहींचे डोळे पाणावतात.. पण हे सगळं क्षणिक असतं. काही दिवसांतच पहिले पाढे पंचावन्न होतात. उन्हाळा गेला की पावसाळा सुरू होतो. बातम्यांचं स्वरूप काहीसं बदलतं. कोरड्या दिसर्णाया विहिरी धोकादायक कशा बनल्या आहेत हे दाखवलं जातं, कोरड्या नद्या धोक्याची पातळी ओलांडतात, ग्रामीण महिला जीव धोक्यात घालून डोक्यावर हांडे घेऊन नदीचा पूर ओलांडत असल्याचं दृश्य दिसू लागतं.

पाणी घेऊन जाणारी एखादी आई डोंगराच्या निसरड्या रस्त्यावरून पाय घसरून मरण पावल्याची बातमी येते. काही दिवसांतच अशा बातम्यांची आपापसात स्पर्धा सुरू होते. मग सरकारही पुन्हा आश्वासनांची नवी यादी प्रसिद्ध करतं आणि ऋतू बदलला की माध्यमांमध्ये पुन्हा नवे प्रश्न शहरी लोकांचं मनोरंजन करायला सज्ज होतात. दुर्लक्षीत राहतो तो ग्रामीण भागातील पाणी प्रश्न!

'शेजाऱ्या'चा शोध

कार्ल सेगन या शास्त्रज्ञाच्या म्हणण्यानुसार, कोणत्याही ग्रहावर काही विशिष्ट स्थिती जुळून आल्या, तर तिथे सजीव सृष्टी निश्चित निर्माण होईल. 'के२-१२बी' या ग्रहाबाबत अलीकडच्या संशोधनामुळे याबाबत आशा पल्लवित झाल्या आहेत. आपल्या आकाशगंगेतील चार हजारपेक्षा जास्त ताऱ्यांभोवती ग्रहमाला आहेत. सिंह तारकासमूहात, पृथ्वीपासून १२४ प्रकाशवर्षे अंतरावर के२-१८ नावाचा लाल खुजा तारा आहे. त्याच्याभोवती दोन ग्रह असल्याचा शोध केपलर दुर्बिणीने २०१५मध्ये लावला. 'के२-१८बी' आणि 'के२-१८सी' अशी नावे दिलेल्या या दोन ग्रहांपैकी 'के२-१८बी' या 'सुपर अर्थ' प्रकारातील या ग्रहाची त्रिज्या पृथ्वीच्या अडीचपट आहे. पितृताऱ्यापासून २.१४ कोटी किमी अंतरावरून फिरणाऱ्या या ग्रहाला ताऱ्याभोवती एक प्रदक्षिणा मारायला ३३ दिवस लागतात. हा ग्रह पितृताऱ्याच्या 'वसाहतयोग्य' क्षेत्रात (हॅबिटेबल झोन) असून, या अंतरावर पाणी अथवा पाण्यास

कोको नानकटाई

साहित्य : १०० ग्रॅम मैदा, २० ग्रॅम कोको पावडर, १०० ग्रॅम पिठीसाखर, ७५ ग्रॅम पांढरे लोणी किंवा वनस्पती तूप, १/२ टीस्पून व्हॅनिला इसेन्स, १/४ टीस्पून बेकिंग पावडर.

कृती : पिठीसाखर-लोणी/तूप एकत्र करून हलके होईपर्यंत फेटून घ्या. मैद्यात बेकिंग पावडर, कोको पावडर टाकून चाळून घ्या. फेसलेल्या लोणीत चाळलेला मैदा व व्हॅनिला इसेन्स घाला. मिश्रणाचे लहान गोळे करा. ते दाबून जरा चपटे करून बेकिंग ट्रेमध्ये १ इंचाचे अंतर ठेवून मांडा. कन्व्हेक्शनवर मायक्रोवेव्ह प्रि-हीट करून १६० डिग्रीवर ५ मिनिटे बेक करा.

स्ट्रेच मार्क लपवण्यासाठी मेकअपच्या 'या' टिप्स येतील कामी, जाणून घ्या अधिक

बहुतांश वेळेस महिलांना प्रेग्नन्सीनंतर शरीरावर स्ट्रेच मार्क येतात. त्यामुळे एखादा शॉर्ट कुर्ता किंवा टी-शर्ट घातल्यास शरीरावरील स्ट्रेच मार्क दिसून येतात. असे झाल्यास आपल्याला स्ट्रेच मार्कमुळे अवघडल्यासारखे वाटते.

यामुळे आपण काही वेळेस स्टायलिश कपडे घालण्याचा विचार करत नाही. स्ट्रेच मार्क हे त्वचेवर ताण पडल्यास निर्माण होतात. यामध्ये घाबरण्याची किंवा लाजण्याची काहीच गरज नाही. पार्टीसाठी तयार होण्यासाठी काही जण हेच स्ट्रेच मार्क लपवण्यासाठी विविध उपाय करतात. तर जाणून घ्या स्ट्रेच मार्क लपवण्यासाठी तुम्हाला मेकअपमधील काही सोप्या टिप्स कामी येतील.

स्ट्रेच मार्क लपवण्याची वेळ आल्यास रंगांची विसंगती काही वेळेस होते. त्यामुळे जर तुमची त्वचा तांबड्या रंगाची असेल तर त्याला हलक्या रंगाच्या मेकअपमधील पिवळ्या रंगाची शेड लावून लपवू शकता. तसेच अंगावरील स्ट्रेच मार्क खूप जुने असल्यास त्याबाबतसुद्धा काळजी करण्याचे काहीच कारण नाही. अशावेळी तुम्ही तुमच्या स्कीन टोनप्रमाणे रंग निवडून स्ट्रेच मार्क लपवू शकता.स्ट्रेच मार्क लपवल्यानंतर त्यावरील मेकअप कायम राहावा यासाठी मेअकप ब्रशने त्यावर सेटिंग पावडर लावणे विसरू नका. तसेच मेकअप शिवाय तुम्ही सेल्फ-टॅनरच्या मदतीने सहजतेने लपवू शकता. असे केल्यास तुम्हाला स्ट्रेच मार्क दिसत असल्याचीही जाणीव होणार नाही आणि तुम्ही मोकळेपणाने पार्टी एन्जॉय करू शकता.

केस गळती रोखेल कडीपत्ता आणि जास्वंद तेल

केसगळती ही जागतिक समस्या आहे. बरेच उपाय करूनही केसगळती काही कमी होत नाही. पण आपण कडीपत्ता आणि जास्वंदाच्या तेलाच्या वापर केल्यास केस गळतीपासून काहीसा आराम मिळू शकतो. यासाठी आपल्याला याचे तेल बनवावे लागणार आहे. चला तर मग हे तेल कसे बनवायचे आणि त्याचा वापर कसा करायचा हे जाणून घेऊ या.

साहित्य- १०० ग्रॅम नारळाचे तेल, ३-४ चमचे एरंडेल तेल, ४ -५ जास्वंदाचे फुले, ३ मूठ कडीपत्ता, ३ चमचे तीळ, ३ चमचे मेथीदाणा, १ वाटी किसलेला कांदा, किसलेला आवळा आणि आले.

कृती : सर्वप्रथम नारळाच्या तेलात कडीपत्ता, जास्वंदाची फुले, तीळ, मेथीचे दाणे, किसलेला कांदा, किसलेला आवळा, आले घालून गॅसवर मंद आचेवर ठेवावे. गॅस मंदच असावा.

नाहीतर तेल जळू शकते. सर्व रसांचा अर्क नारळाचा तेलात उतरल्यावर गॅस बंद करून थंड होण्यासाठी ठेवावे. हे आयुर्वेदिक तेल आठवड्यातून दोनदा लावल्याने केसगळतीच्या त्रासापासून आराम मिळतो आणि केसगळती थांबते. गरज असल्यास एरंडेल तेलसुद्धा टाकावे. अजून चांगले परिणाम मिळतात.

वाढत्या प्रदूषणामुळे आरोग्यावर परिणाम जाणून घ्या प्रतिबंधात्मक उपाय

वाढते प्रदूषण हा जगभरातील मोठा धोका आहे. प्रदूषणामुळे लोक अनेक गंभीर आजारांना बळी पडत आहेत. वाढत्या वायू प्रदूषणामुळे फुफ्फुसाचे आजार, दमा, धाप लागणे, डोळे जळणे, घशातील संसर्ग, क्षयरोग असे गंभीर आजार होत आहेत. वाढत्या प्रदूषणाचा धोका लक्षात घेऊन जागतिक स्तरावर अनेक संस्था त्यावर उपाययोजना करत आहेत. पण एवढेच नाही तर प्रदूषणामुळे तुम्हाला शरीराशी संबंधित गंभीर आजार तर होतातच पण त्यामुळे तुमच्या मानसिक आरोग्यावरही वाईट परिणाम होत आहेत. ब्रिटिश मेडिकल जर्नलमध्ये प्रसिद्ध झालेल्या अहवालानुसार, जगभरातील प्रदूषणामुळे १८ ते २५ वयोगटातील तरुणांना अनेक मानसिक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. हवामान बदल, ग्लोबल वॉर्मिंग आणि अनेक गंभीर आजारांशिवाय प्रदूषणाचा लोकांच्या मानसिक आरोग्यावर वाईट परिणाम होत आहे. वाढत्या प्रदूषणामुळे तरुणांना पर्यावरण चिंतेची समस्या भेडसावत आहे. प्रतिध्वनी चिंताची कारणे, लक्षणे आणि प्रतिबंधात्मक उपायांबद्दल तपशीलवार जाणून घेऊया.

इको चिंता म्हणजे काय?

वाढत्या प्रदूषणामुळे शरीराला गंभीर आजार तर होत आहेतच, पण त्याचबरोबर ते मानसिक समस्यांनाही कारणीभूत ठरत आहे. वातावरणातील बदल, ग्लोबल वार्मिंग आणि वायू प्रदूषणाची वाढती पातळी यामुळे लोकांच्या मानसिक आरोग्यावर वाईट परिणाम होत आहे. अमेरिकन सायकियाट्रिक असोसिएशन (एपीए) च्या मते, पर्यावरण-चिंता ही अशी स्थिती आहे जी वाढत्या प्रदूषणामुळे आणि हवामानातील बदलांमुळे लोकांमध्ये चिंतेचे कारण बनते. त्यामुळे लोकांमध्ये अनिश्चित भीतीचे वातावरण निर्माण होऊन मानसिक आरोग्यावर परिणाम होत आहे. चिंतेमुळे लोकांच्या कामावरही परिणाम होत असून त्यामुळे शारीरिक आरोग्यावरही परिणाम होत आहे. काही काळापूर्वी मानसशास्त्रज्ञांनी इको ॲन्झायटी दिली आहे आणि जगभर त्याविषयी बरीच चर्चा होत आहे. इको चिंतामुळे तुम्हाला आघात, तणाव, चिंता, नैराश्य आणि भीतीची भावना मुख्यतः १८ ते २५ वर्षे वयोगटातील लोकांमध्ये येत आहे.

इको एंग्जायटीची कारणे

पर्यावरणाच्या समस्या, वाढत्या प्रदूषणामुळे शरीरावर आणि आरोग्यावर होणारे परिणाम या चिंतेमुळे लोक पर्यावरणाच्या चिंतेचे बळी ठरत आहेत. यापैकी सर्वात जास्त प्रभावित लोक १८ ते २५ वयोगटातील तरुण आहेत. याशिवाय, ब्रिटिश मेडिकल जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या संशोधनानुसार, पर्यावरणातील बदल, ग्लोबल वॉर्मिंग आणि पर्यावरणीय संकटे, भविष्यात नोकऱ्या आणि इतर संकटांमुळे लोकांमध्ये पर्यावरणाची चिंता वेगाने पसरते यामुळे लोकांच्या काळजीचे एक कारण म्हणजे ते थांबवण्यासाठी काही करत नाहीत असा लोकांचा समज आहे.

पर्यावरण चिंता लक्षणे

वाढत्या प्रदूषणामुळे आणि पर्यावरणाशी संबंधित बदलांमुळे मानवावर अनेक परिणाम होत आहेत. याचा एक मोठा परिणाम म्हणजे यामुळे लोकांमध्ये पर्यावरणाच्या चिंतेची समस्या निर्माण होत आहे. इको चिंतेमुळे लोकांमध्ये दिसणारी लक्षणे खालीलप्रमाणे आहेत.

जास्त काळजी

■ भीती आणि अनिश्चित भीतीची भावना ■ कनिष्ठतेची भावना ■ झोप समस्या ■ भूक मध्ये बदल ■ लक्ष केंद्रित करू शकत नाही

इको एंग्जायटीपासून वाचण्याचे उपाय

इको चिंता टाळण्यासाठी, आपण प्रथम आपला आहार आणि आरोग्याकडे लक्ष दिले पाहिजे. याशिवाय, जर तुम्ही तुमच्या दिनचर्येतून थोडा वेळ काढू शकत असाल, तर तुम्ही पर्यावरणाशी संबंधित काही कामात स्वतःला झोकून दिले पाहिजे. याशिवाय तणाव किंवा चिंता यासारख्या मानसिक समस्या टाळण्यासाठी या गोष्टी लक्षात ठेवा.

■ मद्यपान आणि धूम्रपानापासून दूर राहावे.
■ कॉफी आणि कॅफिनयुक्त पदार्थांचे सेवन कमी करा.
■ उद्या किंवा भविष्याबद्दल जास्त काळजी करू नका.
■ नकारात्मक परिस्थिती आणि नकारात्मक विचारांपासून दूर राहा. ■ सकस आणि संतुलित आहार घ्या.
■ नियमित व्यायाम करा.

इंटरनेटविना होईल ऑनलाइन पेमेंट! जाणून घ्या कशाप्रकारे वापरता येईल गुगल वॉलेट

भारतात सध्या ५जी इंटरनेट कनेक्टिव्हिटी सादर करण्यात आली आहे, परंतु तरीही काही ठिकाणी आजही इंटरनेट कनेक्टिव्हिटी उपलब्ध नाही. त्यामुळे गुगलची एक नवीन टेक्नॉलॉजी खूप उपयुक्त ठरू शकते. ज्यात इंटरनेटविना ऑनलाइन पेमेंट करता येईल. गुगलनं कॉण्टॅक्टलेस पेमेंट सिस्टम सादर केली आहे. यात गगुल वॉलेट व्हर्च्युअल कार्ड पेमेंटशी जोडले जाईल. या टेक्नॉलॉजीमध्ये गुगलला एकदा इंटरनेट कनेक्शन असताना कार्ड कनेक्ट करावा लागेल. त्यानंतर इंटरनेटविना पेमेंट करता येईल. कार्ड कनेक्ट झाल्यावर तुम्ही सिम्पल टॅप करून पेमेंट करू शकता.

भारतात ५जी इंटरनेट कनेक्टिव्हिटी काही ठिकाणी कमी आहे. त्यापासून वाचण्यासाठी गुगलने वॉलेटमध्ये व्हर्च्युअल कार्ड जोडून एक नवीन पेमेंट सिस्टम सुरू केली आहे. या पेमेंट सिस्टममध्ये गुगल वॉलेटवरून इंटरनेटविना देखील पेमेंट करता येईल.

कशी वापरायची नवीन पेमेंट सिस्टम

कॉण्टॅक्टलेस पेमेंटमध्ये कार्ड आणि कार्डविना फोन किंवा स्मार्टवॉचने पेमेंट करता येईल. जेव्हा तुम्ही गुगल वॉलेट ओपन करता तेव्हा एक डिफॉल्ट व्हर्च्युअल कार्ड दिसते. त्या पॉइंटवर फोन कार्ड डेटा रीडरपर्यंत पोहोचतो. जेव्हा तुमचा अँड्रॉइड फोन एनएफसी सिग्नल रीडरकडे पोहोचतो तेव्हा पेमेंट होतं.

तसेच जेव्हा तुम्ही ऑफलाइन असता तेव्हा तुमचा फोन कोणत्याही समस्येविना गुगल वॉलेटच्या एनएफसी-संचारित कोडचा वापर करून पेमेंट करतो. परंतु जर तुम्ही बराच काळ ऑफलाइन राहिलात तर पेमेंट नीट होत नाहीत.

नोट : ऑफलाइन पेमेंटसाठी गुगलला दर दोन दिवसांनी कमीत कमी एकदा इंटरनेटशी कनेक्ट व्हावं लागेल. ज्यामुळे तुम्ही बिनदिक्कत गुगल वॉलेटवरून

ऑफलाइन पेमेंट करू शकाल.

यूपीआय लाइटदेखील येईल वापरता

रिझर्व्ह बँकेने गेल्या आठवड्यात यूपीआय लाइट लॉंच केले. यूपीआय लाईट हे नियमित यूपीआयपेक्षा थोडे वेगळे आहे. हे एक 'ऑन-डिव्हाइस वॉलेट' वैशिष्ट्य आहे, जे वापरकर्त्यांना यूपीआय पिन न वापरता रिअल टाइममध्ये लहान रक्कम पेमेंट करण्याचा पर्याय उपलब्ध करून देते. यूपीआय लाइट लहान रकमेच्या व्यवहारांसाठी तयार केले आहे. त्यामुळे याद्वारे व्यवहाराची सर्वाधिक मर्यादा ५०० रुपये आहे. एनपीसीआय वेबसाइटनुसार यूपीआय लाइटद्वारे ५०० रुपयांपेक्षा कमी पेमेंटसाठी वापरकर्त्यांना यूपीआय पिनची गरज पडणार नाही. याशिवाय एनपीसीआयने म्हटले की, सुरुवातीला यूपीआय लाइट ऑफलाइन काम करेल.

माणसाची पचनक्रिया चांगली असेल तर त्याचे आरोग्य चांगले राहते. व्याधी उद्भवू नयेत किंवा रोगांचा शरीरात शिरकाव होऊ नये, यासाठी पचनक्रिया व्यवस्थित असणे फार महत्त्वाचे असते. पचन बिघडले की अनेक आजार सुरू होतात. पचन बिघडण्यामागे अनेक कारणे असतात.

अपचन : घरच्या घरी मिळवा असा आराम

वेळीअवेळी अरबट चरबट खाणे, अति तेलकट, जड पदार्थांचे वारंवार सेवन, अपुरी झोप, पोट साफ न होणे, दीर्घकाळ काहीही न खाणे यामुळे अपचन होते आणि त्याचा परिणाम म्हणजे पोटात जळजळ, करपट ढेकर, पोटदुखी, पोट फुगणे, उलटी, जुलाब अशी लक्षणे दिसू लागतात. थंडीच्या तुलनेत उन्हाळ्यात अपचन होण्याचे प्रमाण अधिक असते.

अपचन अति खाण्यापिण्यामुळे झाले असेल तर त्यावर काही घरगुती उपचार जरूर करावेत. त्याने बराच आराम मिळतो. अपचनाचा त्रास होऊ लागला की घरात वेलदोडा असतो, त्याची कुटून पूड करावी आणि अर्धा चमचा पूड खडीसाखरेबरोबर घ्यावी. वेलदोडा पाचक आहे. तसेच तीन चिमूट जायफळ पूड आणि दोन चमचे लिंबू रस दररोज घेतल्यास ज्यांना नेहमी अपचन होते, त्यांची समस्या दूर होते.

धणेपूड आणि सुंठ यांचे मिश्रण पचनासाठी फार मदतगार ठरते. दोन चमचे धणेपूड, अर्धा चमचा सुंठ दोन ग्लास पाण्यात घालून उकळून थंड करावे. हे पाणी २-२ चमचे तीन वेळा घ्यावे. सुंठ आणि बडीशेप पचन सुधारण्यास मदत करणारे आहेत. पाव चमचा सुंठ, १चमचा बडीशेप आणि थोडी खडीसाखर सकाळ, दुपार, संध्याकाळ चावून खावी.

पोट फार दुखत असेल तर ओवा तव्यावर भाजून चावून खावा. त्यावर थोडे कोमट पाणी प्यावे. आल्याचा रस आणि सैंधव व थोडे हिंग यांचे चाटण करून ते घ्यावे. आल्याचे नुसते तुकडे चावून खावेत. हिंग पोट विकारांवर अतिशय उत्तम गुणकारी असून त्यामुळे गॅस कमी होण्यास मदत मिळते. हिंग कोमट पाण्यात घालून प्यावे किंवा पूड पोटावर चोळावी. सकाळी पिकलेले केळे खाल्ल्यानेही पचन सुधारते.

घनदाट, मुलायम केसांसाठी लावा केळ्यांपासून तयार केलेला हेअर पॅक

स्त्रियांचे खरं सौंदर्य त्यांच्या केसात दडलेलं असतं, असं म्हणतात. अनेक जणींना लांब, काळेभोर केस आवडतात. मात्र सध्याच्या धकाधकीच्या जीवनात अशा लांबसडक केसांची काळजी घेणं शक्य होत नाही. केसांची काळजी ही लहानपणी आई घेते आणि नंतर मोठेपणी अनेक कारणांनी त्याकडे दुर्लक्ष होते आणि मग अचानक कधीतरी जाणवते... केस गळत आहेत, पिकताहेत, रुक्ष झालेत इत्यादी. मग त्यानंतर घनदाट, मुलायम आणि निरोगी केसांसाठी घरगुती उपाय करण्याकडे अनेकांचा कल असतो. आज आपण घनदाट केसांसाठी केळ्यांचा उपाय कसा करतात याची माहिती जाणून घेणार आहोत.

केळी हे बिनबियांचे फळ आहे. निसर्गतःच जंतुनाशक वेष्टनामध्ये असल्याने केळ्यातून जंतूंची बाधा होत नाही, त्यामुळे आपोआपच सर्वांचे आरोग्य उत्तम राहते. वर्षभर उपलब्ध असणारे, सर्वांच्या खिशाला परवडणारे हे फळ आबालवृद्धांना आवडते. केळ्याला शास्त्रीय भाषेमध्ये 'मुसा पॅराडिसिअॅका' म्हटले जाते. केळ्यापासून तयार केलेला हेअर पॅक तुम्हाला घनदाट आणि निरोगी केस तसेच केसांची गळती, कोंडा थांबवतो. जाणून घेऊयात केळ्यांपासून हेअर पॅक कसा तयार करतात.

सामग्री

● केळी ● एक चमचा मध ● एक चमचा केसाला लावायचे तेल ● एक चमचा दही.

असा तयार करा हेअर पॅक

● केळ्यांची मिक्सरमध्ये पेस्ट तयार करून घ्या.

● या पेस्टमध्ये मध, तेल आणि दही टाकून पुन्हा मिक्सरमध्ये एकत्र करा.

● त्यानंतर या पेस्टला केसांवर लावा अन् चांगली मालीश करा.

● एक ते दोन तास ही पेस्ट केसावरच राहू द्या.

● तुमच्या नियमित शाम्पूने केसांना चांगले धुऊन घ्या आणि कंडीशनर लावा.

कंडीशनर लावल्यानंतर कंगव्याने केसांना हळूहळू विंचरा; जेणेकरून केसांमधील केळ्याचा तुकडा किंवा हेअर पॅक राहणार नाही. त्यानंतर थोडा वेळ थांबा आणि पुन्हा कंगव्याने केस विंचरा.

मासिक पाळी अनियमित होण्यामागील कारणे, दुर्लक्ष करू नका

स्त्रियांमध्ये मासिक पाळीचा कालावधी नियमित असणे चांगलेच असते. हे चांगल्या आरोग्याचे सूचक असते. जर ती उशिरा किंवा अनियमित येत असेल तर यामागची अनेक कारणे असू शकतात. जास्त वजन वाढणेदेखील पाळी उशिरा येण्याचे कारण असू शकते. याव्यतिरिक्त इतर कारणं कोणती असू शकतात, जाणून घेऊया...

● जास्त वजन किंवा लठ्ठपणादेखील मासिक पाळीच्या अनियमिततेचे प्रमुख कारण असू शकते. कधी कधी ही समस्या थायरॉईडच्या आजारामुळेसुद्धा उद्भवते. त्यासाठी वैद्यकीय सल्ला घेणे आवश्यक असते.

● कमी किंवा जास्त वयामध्ये मासिक पाळी सुरू होणेदेखील अनियमितता असू शकते. ही एक सामान्य गोष्ट असू शकते. कालांतराने हे नियमित होऊ शकते, काळजी करायचे काहीच कारण नाही.

● पॉलिसिस्टिक अंडाशय सिंड्रोम मासिक पाळी उशिरा येण्याचे एक गंभीर कारण असू शकतं, म्हणून जर का वरील दिलेल्या कारणांव्यतिरिक्त अन्य काही घडत असल्यास त्याची चौकशी केली पाहिजे.

● जास्त ताण आणि जास्त व्यायाम करणेसुद्धा मासिक पाळीच्या अनियमिततेचे कारण असू शकतं. अंडाशयावर आवरण (सिस्ट) बनल्यामुळेसुद्धा मासिक पाळीची अनियमितता असू शकते.

पारिजातकाच्या फुलांचे आश्चर्यकारक फायदे

◆ **ताण कमी करते :** पारिजातकाच्या फुलांमध्ये ताण दूर करण्याची शक्ती असते. जीवनात हे फूल आनंद पसरवते. त्याच्या सुगंधामुळे मेंदूला शांतता मिळते.

◆ **थकवा निवळतो :** पारिजातकाची फुले रात्रीच्या वेळी उमलतात आणि सकाळी कोमेजतात. अशी आख्यायिका आहे की पारिजातकाला स्पर्श मात्र केल्यानेच अंगातला सर्व थकवा दूर होतो.

◆ **चिरतारुण्य :** पौराणिक कथेनुसार पारिजातकाच्या झाडाला स्वर्गातून पृथ्वीवर आणल्याचे मानले जाते. नरकासुराच्या वध केल्यावर श्रीकृष्ण स्वर्गात गेले असताना इंद्राने त्यांना पारिजातकाचे फूल दिले. कृष्णाने ते फूल देवी रुक्मिणीला दिले. देवी सत्यभामेला देवलोकाची देवमाता आदितीने नेहमी चिरतारुण्य राहण्याचा वर दिला. तेवढ्यात नारद तिथे आले आणि त्यांनीही सत्यभामेला पारिजातकाची महती सांगितली. त्या प्रभावामुळे देवी रुक्मिणी पण चिरतारुण्यवती झाली. सत्यभामेला हे कळल्यावर ती क्रोधीत झाली. तीने श्रीकृष्णाकडून पारिजातक वृक्ष घेण्याचा आग्रह धरला. अशी आख्यायिका आहे की, पारिजातकाच्या वृक्षाचा उगम समुद्रमंथनाच्या वेळेस झाला होता; ज्याला इंद्राने आपल्या बागेत लावला होता.

◆ **हृदयविकारावर फायदेशीर :** पारिजातक हृदयविकारामध्ये फायदेशीर असते. १५ ते २० फुलांचा रस घेणे हृदयासाठी फायदेशीर असते. हृदयरोग रोखण्यासाठी हा एक प्रभावी मार्ग आहे. हा उपाय डॉक्टरांच्या सल्ल्याने करायला हवा.

अनुलोम, विलोम म्हणजे काय? हे घरी कसे करावे?



प्राणायामाची सुरुवातीची क्रिया आहे अनुलोम आणि विलोम. यामुळे मेंदूमध्ये ऑक्सिजनची पातळी वाढते. यामुळे फुफ्फुसं बळकट होतात. कोरोनाच्या संसर्गाच्या काळात आपले फुफ्फुस बळकट असणे गरजेचे आहे. जाणून घेऊ या अनुलोम, विलोम प्राणायाम कसा करावा...

प्राणायामात ३ क्रिया करतात

१. पूरक, २. कुंभक, ३. रेचक

यालाच हठयोगी अभ्यानंतर वृत्ती, स्तंभ वृत्ती आणि बाह्य वृत्ती असेही म्हणतात. हेच अनुलोम आणि विलोम आहे. नाडीशोधन प्राणायामाची ही सुरुवातीची क्रिया असते.

१. पूरक : नियंत्रित वेगाने श्वासाला आत घेण्याची क्रिया पूरक असते. श्वास आत घेताना किंवा बाहेर सोडताना दोन्ही वेळेस त्यामध्ये लय आणि अनुपात असणे गरजेचे असते.

२. कुंभक : आत घेतलेल्या श्वासाला क्षमतेनुसार रोखून धरण्याच्या प्रक्रियेला कुंभक म्हणतात. श्वास आत रोखण्याची क्रिया आंतरिक कुंभक आणि श्वासाला बाहेर सोडून काही वेळ थांबण्याच्या क्रियेला बाह्य कुंभक म्हणतात. यामध्ये लय आणि अनुपात असणे गरजेचे आहे.

३. रेचक : आत घेतलेला श्वास हळुवारपणे सोडण्याच्या क्रियेला रेचक म्हणतात. यामध्ये श्वास घेताना आणि सोडताना दोन्ही वेळेस लय आणि अनुपात असायला हवा.

फायदे : सर्व प्रकारचे ताणतणाव कमी करून शांती देणाऱ्या या प्राणायामामुळे शरीराच्या सर्व नाड्यांना लाभ मिळतो. डोळे सतेज होतात, रक्तपुरवठा सुरळीत होतो. निद्रानाशाचा त्रास असल्यास त्यासाठी पण हे फायदेशीर आहे. त्याचबरोबर मेंदूचे सर्व विकार दूर करण्यासाठी सक्षम आहे. या प्राणायामामुळे फुफ्फुसात साचलेली घाण बाहेर निघते आणि फुफ्फुसं बळकट बनतात. किमान १० मिनिटे अनुलोम, विलोम प्राणायाम केल्याने डोकेदुखीच्या आजारापासून मुक्ती मिळते. नकारात्मक विचारांपासून मन दूर होऊन आनंद आणि उत्साहात वाढ होते.

हिंदी भाषा सक्तीनंतर आता राज्य सरकारचा मोठा निर्णय
शिक्षणमंत्री दादाजी भुसेंनी केलं जाहीर

■**मुंबई** : महाराष्ट्रात पहिली ते पाचवीपर्यंत इंग्रजीबरोबर हिंदी भाषाही सक्तीची करण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयावर टीकेची झोड उठली आहे. विरोधकांनी या निर्णयावर नाराजी जाहीर केली असून, सरकारला लक्ष्य केलं आहे. दरम्यान अखेर राज्य सरकारने या निर्णयावर एक पाऊल मागे घेतलं आहे. हिंदी शिकणं अनिवार्य नसून, ऐच्छिक ठेवणार असल्याचा खुलासा शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी केला आहे. ते मुंबईत पत्रकार परिषदेत बोलत होते. यासंदर्भातील सुधारित शासन निर्णय लवकरच जारी करणार असल्याचं ते म्हणाले आहेत.

हिंदीच्या सक्तीवर ते म्हणाले की, ''हिंदी भाषेच्या संदर्भामध्ये केंद्राकडून काही थोपवलं जात असल्याची जी चर्चा सुरु आहे तसं काही नाही. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० नुसार भाषेच्या संदर्भातला जे काय आहे त्यात तीन भाषेचे सूत्रीकरण केले आहे. तुमच्यावर थोपविले जात आहे असे कुठेही लिहिले नाही''. ९ सप्टेंबर २०२४ ला सुकाणू समितीच्या बैठकीमध्ये तृतीय भाषा हिंदी म्हणून समावेश करण्याचा निर्णय झाला अशी माहिती त्यांनी दिली.

''मराठी भाषा अनिवार्य आणि अंमलबजावणी कशी केली जाईल हे आधीच सांगितलं आहे. मराठी आणि इंग्रजी माध्यमांच्या व्यतिरिक्त बंगाली, उर्दू, हिंदी, ज्या इतर शाळा आहेत त्या भाषेला प्राधान्य देतात. मराठी बंधनकारक आहे आणि तिसरी इंग्रजी नाहीतर अन्य निवडतात. अशाप्रकारे तीन भाषांचं शिक्षण दिलं जातं. आपण इंग्रजी स्विकारलं आहे पण हिंदी का? याचे उत्तर देतो. आपल्या मुलांना सोप्या पद्धतीने शिकायला होईल देवनागरी लिपी समान आहे. शिक्षकांना हिंदी शिकवणं अवघड नाही,'' असं ते म्हणाले

''राष्ट्रीय शिक्षण धोरणामध्ये हिंदीचा बहुभाषिक म्हणून पुरस्कार केला आहे. हिंदी अभिषेक केंद्र शासनाने बंधनकारक केलं नाही. आपल्या राज्याच्या सुकाणू समितीने पहिली मराठी, दुसरी इंग्रजी. तृतीय भाषा म्हणून हिंदी त्या ठिकाणी स्वीकारली आहे. याच गोष्टीच्या आधारावर शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. अनिवार्य या शब्दामुळे गोंधळ झाला आहे. काही वेगळ्या भाषा शिकण्यासंदर्भात पण मागणी आहे. हिंदी शिकणं ऐच्छिक ठेवणार आहोत. पहिली मराठी, दुसरी इंग्रजी आणि तिसरी हिंदी ऐच्छिक आहेत त्यांनाच शिकवली जाईल,₹ असं दादा भुसे यांनी स्पष्ट केलं. हिंदी बाबतचा पुढचा शासन निर्णय सुधारित लवकरच जारी केला जाईल असंही ते म्हणाले आहेत. इतर भाषेसंदर्भात त्या वर्गातून किती विद्यार्थ्यांची मागणी येते त्याचा अभ्यास करुन निर्णय घेतला जाईल'' असंही ते म्हणाले आहेत.

''दोन क्रमांकाला इंग्रजी आपण स्वीकारलं आहे तर तिसऱ्या नंबरला हिंदी हे शासन भाषा म्हणून स्वीकारायला हरकत नाही. या हिंदीचा फायदा विद्यार्थ्यांना होणार असून, शिक्षकांना शिकवायला सोपं आहे. हिंदी अनेकदा कानावर येत असते त्यामुळे विद्यार्थ्यांना हिंदी शिकायला सोपं आहे. म्हणून हिंदीचा विचार करण्यात आला आहे,'' अशी बाजू त्यांनी मांडली.

पालिकेचे फेरीवाले धोरण अद्याप कागदावरच

■**विरार** : वसई-विरार महापालिकेचे फेरीवाले धोरण सात वर्ष रखडल्याने फेरीवाल्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. त्यामुळे अनेक भागांत फेरीवाल्यांनी अतिक्रमण करून बस्तान मांडले आहे. यामुळे पालिकेने फेरीवाला धोरण लवकरात लवकर निश्चित करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

वसई-विरार शहरात फेरीवाल्यांचा प्रश्न गंभीर झाला आहे. महापालिकेच्या हद्दीत फूटपाथ, रस्त्याच्या कडेला, गर्दीच्या ठिकाणी, मोकळ्या परिसरात कपडे, मोबाइलचे साहित्य, भाजीविक्रेते, फळ यांच्यासह विविध सामान विकणारे विक्रेते बसतात. यामुळे नागरिकांना चालणे कठीण झाले असून वाहतूक व्यवस्थेवर ताण येत आहे. शहरात दररोज तासनतास वाहनांची वाहतूक कोंडी होत आहे.

पालिकेतर्फे धोरणात्मक कोणताही निर्णय न झाल्याने फेरीवाला धोरण अजून बारगळले असल्यामुळे नागरिकांना याचा मनस्ताप सहन करावा लागत आहे. कोरोना वैश्विक महामारीच्या काळात वसई- विरारमधील फेरीवाल्यांची संख्या लाखोच्या घरात गेली असल्याचा अंदाज वर्तवला जात आहे. यामुळे शहरात मिळेल त्या ठिकाणी या फेरीवाल्यांनी आपले बस्थान मांडले आहेत. फेरीवाले धोरण निश्चित केल्यानंतर वाहतूक कोंडीचा प्रश्न सुटून पालिकेच्या उत्पन्नात भर पडेल, असे मत अभ्यासकांकडून मांडले जात आहे. यामुळे पालिकेने धोरण लवकरात लवकर लागू करावे, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरू लागली आहे.

फेरीवाला धोरणाचा ठराव?

सप्टेंबर २०१९ च्या झालेल्या महासभेपुढे फेरीवाला धोरणाचा ठराव मंजूर करण्यासाठी ठेवण्यात आला होता. या ठरावामध्ये प्रस्तावित क्षेत्रांचे प्रभागनिहाय झोन निश्चित करण्यात आले होते, मात्र त्यावेळी पालिकेवर असलेले सत्ताधारी तसेच विरोधकांतर्फे निश्चित केलेल्या झोनला विरोध करण्यात आला आणि ठराव स्थगित झाला.

२०१४ मधील फेरीवाल्यांची संख्या?

राज्य सरकारचे सन २०१४ मध्ये शहरांमधील ह्यराष्ट्रीय फेरीवाला धोरण लागू करावे असे आदेश होते. त्यानुसार फेरीवाल्यांचे सर्वेक्षण बायोमेट्रिक पद्धतीने वसई विरार पालिकेने पूर्ण केले होते. यामध्ये १२ हजार ७६८ स्थिर फेरीवाले आणि २ हजार ३८८ अस्थिर फेरीवाले यांची नोंद करण्यात आली होती.

पीएम स्वानिधी योजना काय?

पीएम स्वनिधि योजना ही भारतातील एक स्वयं-रोजगार योजना आहे. जी लघु विक्रेत्यांना आणि पथ विक्रेत्यांना कर्ज देण्यावर लक्ष केंद्रित करते. या योजनेच्या माध्यमातून लघु आणि मध्यम व्यापारी आपला व्यवसाय वाढवू शकतील आणि त्यांचे आर्थिक जीवन सुधारू शकतील.

उल्हास नदीतील जलपर्णी हटवण्याचे काम सुरू

■**डोंबिवली** : ठाणे जिल्ह्याची तहान भागवणारी उल्हास नदी दिवसेंदिवस प्रदूषित होत चालली आहे. औद्योगिक कचरा, सांडपाणी आणि जलपर्णीमुळे नदीचे अस्तित्व धोक्यात आले आहे. मात्र या समस्येवर तोडगा काढण्यासाठी 'मी कल्याणकर' सामाजिक संस्थेच्या पुढाकाराने आणि कल्याणचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या प्रयत्नांमुळे एक महत्त्वपूर्ण बैठक नुकतीच पार पडली. खासदार शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली एमएमआरडीए (मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण) च्या वरिष्ठ अधिकारी अशीन गुप्ता आणि अन्य संबंधित अधिकार्यांसोबत बैठक घेण्यात आली. या बैठकीमध्ये उल्हास नदीतील जलपर्णी हटवण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याचा निर्णय घेण्यात आला. यानुसार एमएमआरडीएच्या निधीतून भाडे तत्वावर १० जलपर्णी काढणाऱ्या मशीन तातडीने आणण्याचा निर्णय झाला आहे. या उपक्रमातून फक्त जलपर्णीच नव्हे तर इतरही केरकचरा, प्लास्टिक काढण्यात येणार आहे. उल्हास नदीचे पुनरुज्जीवन करण्याचा मुख्य उद्देश आहे. याशिवाय नदीकाठच्या नागरिकांमध्ये पर्यावरणीय जाणीव वाढवण्यासाठी विविध जनजागृती मोहीम देखील राबवण्यात येणार आहेत. या उपक्रमात मी कल्याणकर संस्थेचे प्रमुख नितीन निकम यांचा विशेष पुढाकार आहे. त्यांनी या संपूर्ण प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्ते सातत्याने नदी स्वच्छतेसाठी काम करत आहेत.

या बैठकीनंतर लगेचच मशीन उल्हास नदी परिसरात दाखल करण्यात आली आहे. जलपर्णी काढण्याचे काम युद्धपातळीवर सुरू झाले आहे. विशेष म्हणजे, ही कामगिरी फक्त एखाद्या सरकारी योजनेपुरती मर्यादित नसून मी कल्याणकर संस्थेचे सदस्य, स्थानिक नागरिक, आणि स्वयंसेवी संस्था देखील यात सक्रिय सहभाग घेत आहेत. यामुळे या उपक्रमाला खऱ्या अर्थाने लोकसहभागाची साथ मिळाली आहे.

सातव्या वेतन आयोगाप्रमाणे पगार
तरीही लाचखोरी सुरूच

■**अलिबाग** : सातव्या वेतन आयोगाप्रमाणे गलेलठ्ठ पगार मिळत असूनही लोकांची कामे करण्यासाठी लाचखोरी थांबलेली नाही. म्हसळा तालुक्यातील अशाच एका प्रतिलिपी तथा भूकरमापकाला (सर्व्हेअर) लाचलुपत विभागाच्या पथकाने रंगेहाथ पकडले आहे. विशाल भिमा रसाळ (29) असे या कर्मचाऱ्याचे नाव असून त्याला ५० हजार रुपयांची लाच घेताना माणगाव बस स्थानकात पकडण्यात आले आहे. अलिबाग न्यायालयाने त्याला दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

काय आहे प्रकरण?

रायगड जिल्ह्यातील म्हसळा भूमी अभिलेख कार्यालयातील भूकरमापक कर्मचारी विशाल भिमा रसाळ याने तक्रारदाराराकडून (वय ३४) म्हसळा तालुक्यातील वरवटणे गावातील सर्वे क्रमांक ५२/१ ब या जमिनीची मोजणी आकारफोड आणि क प्रत देण्यासाठी ५० हजार रुपयांची लाच मागितली होती. ९ एप्रिलची ही घटना आहे. त्यानंतर तक्रारदाराने एसीबीकडे तक्रार केली. एसीबीने माणगाव बस स्थानकात १७ एप्रिल रोजी सापळा रचून पंच साक्षीदार यांच्या समक्ष तक्रारदाराकडून ५० हजारांची लाच घेताना विशाल रसाळ याला रंगेहाथ पकडले.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग रायगडचे पोलीस उप अधीक्षक शशिकांत पाडावे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक भिसे, पथक सहाय्यक फौजदार विनोद जाधव, अरुण करकरे, हवालदार महेश पाटील, सागर पाटील यांनी ही कारवाई केली. या प्रकरणी म्हसळा पोलीस ठाण्यात पहाटे साडेतीन वाजता गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईनंतर म्हसळा महसूल विभागात खळबळ उडाली आहे. दरम्यान, कोणत्याही शासकीय अधिकारी किंवा कर्मचारी शासकीय काम करण्यासाठी लाच मागत असेल तर तत्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग रायगड, अलिबाग कार्यालयात (०२१४१-२२२३३१/टोलफ्री क्र.१०६४) तक्रार करावी, असे आवाहन एसीबीने केले आहे.

आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यावर भर
सिडको उपाध्यक्षांनी घेतला नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचा आढावा

■**नवी मुंबई** : नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पासंबंधी विमानतळ माहिती प्रकाशन (एआयपी) प्रकाशित झाल्यापासून व संचालक, नागरी विमान उड्डाण (डीजीसीए) यांच्याकडून विमानतळ अनुज्ञप्तीकरिता देण्याकरिता निरीक्षण सुरू असल्याने विमानतळाचे उद्घाटन व परिचालन करण्याच्या दृष्टिकोनातून एअरसाइड, लॅन्डस्लाइड आणि टर्मिनल इमारत यांचे काम पूर्ण करणे, कामे पूर्ण करण्यासंदर्भात येणारी आव्हाने जाणून घेणे व या आव्हानांवर मात करून नियोजित वेळेत कामे पूर्ण करण्याच्या दृष्टिकोनातून सदर आढावा बैठकीमध्ये भर देण्यात आला. सवलतधारक एनएमआयएएल यांनी प्रकल्पाचे काम नियोजित कालाधीत पूर्ण करण्याकरिता सर्व प्रयत्न सुरू आहेत.

प्रतिवर्ष २० दशलक्ष प्रवासी

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रतिवर्ष ९० दशलक्ष प्रवासी व ३.२ दशलक्ष टन मालवाहतुकीकरिता नियोजित असून लवकरच सुरू होणाऱ्या विमानतळाच्या टप्पा-१ ची क्षमता प्रतिवर्ष २० दशलक्ष प्रवासी व ०.८ दशलक्ष मालवाहतुकीकरिता नियोजित आहे. सध्याच्या टप्प्यात नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ येथे दोन समांतर टॅक्सी मार्गासह कोड, एफ धावपट्टी, १ टर्मिनल (टी।), कार्गो टर्मिनल आणि इतर अनेक सहाय्यक पायाभूत सुविधा असणार आहेत.

सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, विजय सिंघल, यांनी गुरुवारी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पासंदर्भात आढावा बैठक घेतली. या प्रसंगी सहव्यवस्थापकीय संचालक, शान्तनु गोयल आणि मुख्य महाव्यवस्थापक (परिवहन व विमानतळ) गीता पिल्लई, हे उपस्थित होते. विजय सिंघल यांनी जीत अदानी, संचालक-एअरपोर्ट, अदानी समूह यांच्यासमवेत अदानी समूह संचालक मलय महादेवया, मुख्य कार्यकारी अधिकारी, बीव्हीजी के शर्मा, यांच्या उपस्थितीत प्रकल्पाच्या परिचालन सुसज्जतेचे परीक्षण करण्याकरिता आढावा बैठक घेतली.

पंधरवड्याला आढावा बैठकीचे आयोजन

विजय सिंघल यांनी विमानतळाकरिता भारतीय महामार्ग प्राधिकरण आणि सिडको यांच्यातर्फे विकसित करण्यात येत असलेल्या रस्ते कनेक्टिव्हिटी प्रकल्पाचा देखील आढावा घेतला व विमानतळाचे उद्घाटन होण्यापूर्वी हा प्रकल्प सज्ज करण्याबाबत संबंधितांना निर्देश दिले. देशाच्या तसेच महाराष्ट्राच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या या प्रकल्पाच्या प्रगतीचा अत्यंत बारकाईने आढावा घेण्याकरिता विजय सिंघल यांच्याकडून दर पंधरवड्याला नियमितपणे आढावा बैठकीचे आयोजन करण्यात येते.

माकडे, वानरांकडून मोठा उपद्रव, वनमंत्री गणेश नाईक घेणार मोठा निर्णय!

■**मुंबई** : कोकणातील फळबागा आणि शेतीपिकांना होणारा वानर आणि माकडांचा मोठ्या प्रमाणात होणाऱ्या उपद्रवाला आळा घालण्यासाठी माकडांचे निबीर्जीकरण करण्यासाठी केंद्र उभारण्याचा प्रस्ताव विचाराधीन असल्याचे राज्याचे वन मंत्री गणेश नाईक यांनी सांगितले.

रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली तालुक्यातील शेतकऱ्यांना वन्यप्राण्यांमुळे होणाऱ्या त्रासासंदर्भात वनमंत्री नाईक यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. त्यावेळी नाईक बोलत होत. यावेळी वन विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, उपसचिव विवेक होसिंग, कोल्हापूरचे मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) आर. एम. रामानुजम, विभागीय वन अधिकारी गिरीजा देसाई, दापोली ग्रामोद्योग फार्मर्स प्रोड्युसर कंपनीचे संचालक विनायक महाजन, पत्रकार मिलिंद लिमये, वन्य जीव अभ्यासक संतोष महाजन आदी यावेळी उपस्थित होते. तर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख) शोमिता बिश्वास, अतिरिक्त प्रधान मुख्य वन संरक्षक नरेश झुरमुरे हे दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते. दापोली तालुक्यात रानडुकर, माकड व वानरांमुळे मोठ्या प्रमाणात शेतीचे नुकसान होत असून आता माकडे व वानरे ही गावात येऊन घरातील वस्तूंचेही नुकसान करत असल्याचे महाजन यांनी सांगितले.

रानडुकरांमुळे फळबागा तसेच भातशेतीचे नुकसान होते. त्यांचा बंदोबस्त करण्यासाठी शेतकऱ्यांना कायद्याच्या चौकटीत राहून अनुमती देण्यात यावी. तसेच शेतात येणाऱ्या वन्य प्राण्यांपासून बचावासाठी यापूर्वी कोकणातील शेतकऱ्यांना शस्त्र परवाने देण्यात आले होते. मात्र, हे परवाने निलंबित करण्यात आले आहेत. अशा शेतकऱ्यांना शेतीच्या रक्षणासाठी नियमानुसार परवाने देण्याचे निर्देशही वन मंत्री नाईक यांनी यावेळी रत्नागिरीच्या जिल्हाधिकाऱ्यांना दिले. यावेळी महाजन यांनी वन्य प्राण्यांमुळे होणाऱ्या पिक नुकसानीची भरपाई लवकर देण्यात यावी. तसेच साळिंद्र या प्राण्यामुळे होणाऱ्या नुकसानाचाही समावेश यामध्ये करण्याची मागणी केली.

कोकणात माकडे व वानरांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. वन्य प्राण्यांपासून शेतीचे होणारे नुकसान झाल्यानंतर भरपाई देणे हा कायमस्वरुपी उपाय होऊ शकत नाही. हे नुकसान टाळण्यासाठी दीर्घकालीन प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी माकडे, वानरे यांचे निबीर्जीकरण करण्यासंदर्भात रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यात निबीर्जीकरण केंद्र उभारण्याच्या प्रस्तावावर विचार सुरू आहे. वन्यप्राण्यांपासून फळबाग व शेतीचे होणारे नुकसान टाळण्यासाठी दीर्घकालीन उपाय योजना करण्यासाठी निधीची कोणतीही कमतरता भासू देणार नसल्याचे वनमंत्री नाईक यांनी यावेळी सांगितले.

अखेर ९ वर्षांनंतर अश्विनी बिद्रे यांना मिळाला न्याय, अन्य २ सहकाऱ्यांना ७ वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा

■**नवी मुंबई** : सहाय्यक पोलीस निरीक्षक अश्विनी बिद्रे यांची अत्यंत निर्दयीपणे हत्या करणाऱ्या तत्कालीन वरिष्ठ पोलीस निरीक्षक अभय कुरुंदकर याच्या पापाचा घडा अखेर भरला. अश्विनी यांची हत्या करून त्यांच्या मृतदेहाचे लाकडे कापण्याच्या करवतीने लहानलहान तुकडे करून ते खाडीत फेकणाऱ्या कुरुंदकरला पनवेल जिल्हा न्यायालयाने सोमवारी जन्मठेपेची शिक्षा सुनावली, तर अश्विनी यांच्या मृतदेहाची विल्हेवाट लावून पुरावे नष्ट करण्याचा ठपका कुंदन भंडारी आणि महेश फळणीकर यांच्यावर ठेवून त्यांना ७ वर्षे सश्रम तुरुंगवासाची शिक्षा देण्यात आली.

कुरुंदकर याला वाचवण्यासाठी नवी मुंबई पोलीस दलातील अनेकांनी जीवाचा आटापिटा केला होता. परिणामी, अश्विनी यांच्या नातेवाईकांना न्यायासाठी गेली नऊ वर्षे संघर्ष करावा लागला. मात्र, याच संघर्षाला सोमवारी अखेर यश मिळाले. पनवेलचे अतिरिक्त सत्र न्यायाधीश के. जी. पालदेवार यांनी या खटल्यात एका आरोपीची निर्दोष मुक्तता करून अन्य तिघांना शिक्षा ठोठावली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक अभय कुरूंदकर याने प्रेम प्रकरणातून सहाय्यक पोलीस निरीक्षक अश्विनी बिद्रे यांची मीरारोड येथील आपल्या राहत्या घरी ११ एप्रिल २०१६ रोजी रात्री हत्या केली. त्यानंतर त्याने आणि त्याचे सहकारी कुंदन भंडारी व महेश फळणीकर यांनी अश्विनी यांच्या मृतदेहाचे लाकडे कापण्याच्या कटरने लहान लहान तुकडे करून ते फ्रीजमध्ये ठेवले. दुसऱ्या दिवशी हे सर्व तुकडे गोणीत भरून वसई खाडीत फेकून दिले गेले.

मृतदेह भरलेल्या या गोणी पाण्यावर तरंगू नये, यासाठी त्यांना जड वजने बांधण्यात आली होती. हा गुन्हा करताना कोणताही पुरावा आरोपींनी पाठीमागे ठेवला नव्हता. मात्र पोलीस दलात ह्यलेडी सिंघमह्न म्हणून ओळख असलेल्या तपास अधिकारी सहाय्यक पोलीस आयुक्त संगीता अल्फान्सो यांनी सर्व तांत्रिक पुरावे जमा केले आणि कुरूंदकर गजाआड झाला. २०१९ पासून हा खटला विशेष सरकारी वकील प्रदीप घरत यांनी चालवला. त्यांनी या खटल्यातून बाहेर पडावे, यासाठी नवी मुंबई पोलिसांनी त्यांना कोणतेही सहकार्य केले नाही. त्यांचे मानधन लटकवून ठेवण्यात आले. या प्रतिकूल परिस्थितीमध्ये घरत यांनी जोरदार युक्तिवाद केला. त्यामुळे अभय कुरूंदकरसह अन्य दोन आरोपींवर आरोप सिद्ध झाले.

कुरुंदकरला इतर कलमासाठी झालेली शिक्षा

आरोपी अभय कुरुंदकरला ३०२ हत्येच्या गुन्ह्यात तसेच पुरावा नष्ट केल्याप्रकरणी देखील दोषी ठरवण्यात आले असून त्यात त्याला ७ वर्षे शिक्षा आणि १० हजार रुपये दंडाची शिक्षा ठोठावण्यात आली आहे. त्याचप्रमाणे कलम ३६४ नुसार (अपहरण) १० वर्षे शिक्षा आणि १० हजार रुपये दंड, तसेच ३२३ कलमानुसार मारहाण करण्यासाठी १ वर्षे शिक्षा आणि १० हजार रुपये दंड, तसेच ५०६(२) धमकी देणे या गुन्ह्यात ७ वर्षे शिक्षा आणि १० हजाराचा दंड तसेच कलम ४१७ फसवणूक प्रकरणात १ वर्षे शिक्षा आणि ३ हजार रुपये दंड, त्याचप्रमाणे कलम ४६५ बनावटगिरी केल्याप्रकरणी २ वर्षे शिक्षा व ५ हजार रुपये दंड, त्याचप्रमाणे कलम ४६८ साठी ७ वर्षे आणि १० हजार रुपये दंड, कलम ४७१ साठी २ वर्षे शिक्षा आणि ५ हजार रुपये दंड, कलम २१८ साठी ३ वर्षे शिक्षा आणि १० हजार रुपये दंड ठोठावला आहे. आरोपी अभय कुरुंदकर हा ७ डिसेंबर २०१७ ते २१ एप्रिल २०२५ या ७ वर्षे ४ महिन्याच्या कालावधीत जेलमध्ये राहिल्याने त्याला ठोठावण्यात आलेल्या शिक्षेतून ४२८ नुसार त्याला सवलत मिळू शकते.

अटकेपासूनचा कालावधी शिक्षेसाठी ग्राह्य धरणार

कुंदन भंडारी आणि महेश फळणीकर यांना सात वर्षांच्या तुरूंगवासाची शिक्षा न्यायालयाने सुनावली आहे. ही शिक्षा त्यांच्या अटकेच्या दिवसांपासून ग्राह्य धरली जाणार आहे. हे दोन्ही आरोपी २० आणि २६ फेब्रुवारी २०१८ रोजी अटक झालेले आहेत. तेव्हापासून ते कारागृहातच आहेत. त्यामुळे त्यांची शिक्षा पूर्ण झाली असल्याचे अतिरिक्त न्यायाधीश के. जी. पालदेवार यांनी स्पष्ट केले.

कुरुंदकरला मदत करणाऱ्यांवर टांगती तलवार

या हत्याकांडप्रकरणी आरोपीला पाठीशी घालणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांवर न्यायालयाने जोरदार ताशेरे ओढले. वरिष्ठ पोलीस निरीक्षक पोपेरे, सहाय्यक आयुक्त निलेवाड, नितीन राऊत, उपायुक्त तुषार दोषी यांच्या चौकशीचे आदेश पोलीस आयुक्तांना दिले आहेत. त्यामुळे नवी मुंबई पोलिसांच्या अडचणींमध्ये वाढ झाली आहे.

जव्हार आगाराला १० नव्या अत्याधुनिक बस

■**जव्हार** : राज्य शासनाच्या वतीने जव्हार आगाराला दहा नव्या अत्याधुनिक अशा लाल परी बस देण्यात आल्याने अत्याधुनिकतेने युक्त अशा लाल परीची तालुक्यातील नागरिकांना ओढ लागली आहे. विशेष बाब म्हणजे ४१ आसन क्षमता, प्रत्येक सीटवर दोन चार्जिंग पॉईंट, नैसर्गिक हवा येण्यासाठी सनरूप सुविधा अशा अनेक सुविधा नवीन आलेल्या बसमध्ये पहावयास मिळत आहेत. दरम्यान, या अत्याधुनिक बसने प्रवाशांचे चांगलेच लक्ष वेधले आहे.जव्हार बसस्थानकात पूर्वीच्या पंचावन्न बसेस आहे. आणखी आगारासाठी दहा नवीन एसटी बस उपलब्ध करून देण्यात याव्यात, अशी मागणी शासन, प्रशासन, सामाजिक कार्यकर्ते अशा स्तरावर परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे केली होती. त्यांच्या मागणीचा विचार करून दहा नवीन एसटी बस उपलब्ध करून दिल्या आहेत, विशेष बाब म्हणजे या अत्याधुनिक बसमध्ये प्रवाशांना मोबाईल चार्जिंग करण्यासाठी प्रत्येक सीटवर दोन पॉईंट देण्यात आले आहेत. यामुळे एकाच वेळी दोन मोबाईल चार्जिंग करता येणार आहे. विशेष बाब म्हणजे ४१ आसन क्षमता असणाऱ्या या बस आहे. यामुळे प्रवाशांना आता बसमध्ये उभे राहण्याची गरज पडणार नाही. याचबरोबर बसमधील प्रवाशांना आतमध्ये गरम होऊ नये आणि आतमध्ये नैसर्गिक हवा येण्यासाठी दोन सनरूफची सुविधा आहे. याचबरोबर हायड्रोलिक दरवाजा देखील आहे. सीट पुढे-मागे करण्यासाठी कुशबॅग सीट देण्यात आले आहे. आता या अत्याधुनिक एसटी बसमुळे प्रवाशांचा प्रवास आता चांगलाच आरामदायी होणार आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई 400063 (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com